७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १०६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## सत्ता असूनही एकनाथ शिंदे अस्वस्थ





मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र आणि देशामध्ये फोडाफोडीच्या राजकारणाला उत आलाच आहे. फोडा, तोडा, मोडा आणि राज्य करा असे सुरू आहे. आता नैतिकता, नीतिमत्ता काहीच राहिलेली नाही, कुठेही जावं, कुणाच्याही मांडीवर बसावं, कुणी कुणाला डोक्यावर घ्यावे अन् डोक्यावर घेत पायाखाली तुडवावे ही एक फॅशन झाली आहे, बघू पुढे काय होते ते, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. देशात जे सरकार आहे त्यांच्या काळात देश कर्जबाजारी झाला आहे. जनता परेशान आहे. या परिस्थितीत फोडा फोडीचा विचार येणाऱ्यांना देव सदबुद्धी देईल.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, मतदारसंघातील कामांसाठी उबाठाचे खासदार सत्ताधाऱ्यांकडे जाऊ शकतात, सत्ता त्यांच्याकडे असल्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे आम्ही सुद्धा जात असतो. मतदारसंघातील कामे असतात त्यासाठी जाण्यात गैर काय? उद्धव ठाकरे वेळ देत नाही हा केवळ आरोप आहे, आम्ही ज्या ज्या वेळी त्यांची वेळ मागितली त्यांनी आम्हाला भेटीसाठी वेळ दिली आहे. कोणाचे जेवन चांगले वाटले म्हणून खासदार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडे गेले असतील. यावर जास्त काही बोलणं योग्य नाही. पक्ष फुटण्याची चिन्ह आता तरी काही दिसत नाही.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, एकनाथ शिंदे सत्तेत असूनसुद्धा अस्वस्थ आहेत. त्यांचे अनेक मंत्री अस्वस्थ आहेत. हे पाहता पुन्हा एकमेकांची तारीफ करत एकमेकांच्या जवळ येणं हे चांगले संकेत आहे असे मी मानतो. त्यांना वेगळ्या अँगलने पाहण्याची गरज नाही. राजकारण हे निवडणुकीपुरते असायला हवे. निवडणुकीनंतर भाजपच्या नगरसेवकाला जास्त आणि दुसऱ्या पक्षाच्या नगरसेवकांना कमी निधी महाराष्ट्रात असे कधीही झाले नाही. सरकारने सर्वांना विकासाच्या दृष्टीने मदत करण्याचा विचार केला आहे. पण आता ही नवीन पद्धत रुजली आहे की विरोधकांना पैसे द्यायचे नाही, त्यांच्या मतदारसंघाचा विकास करायचा नाही.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, काँग्रेसमध्ये काहीही मतभेद नाहीत. आम्ही सर्व जण एकमेकांच्या संपर्का असतो. बारामतीबद्दल सुद्धा प्रदेशाध्यक्षांनी दोन ते 3 वेळा फोन करत काय भूमिका घ्यावी या संदर्भात आमच्याशी चर्चा केली. मी पण त्यांना फोन केला की आपण योग्य निर्णय घेतला पाहिजे. एकीकडे फोन करत विनंती करायची आणि दुसरीकडे विरोधी वक्तव्ये करायची याला काहीही अर्थ नाही. तुम्ही तुमच्या नेत्यांचा अपमान करत आहात. मुख्यमंत्र्यांनी आमच्या प्रदेशाध्यक्षांना विनंती केली म्हणून माघार घेतली.

## ठाकरे गटाच्या खासदारांसोबत बैठकच झाली नाही : शिंदें

मुंबई (दै. संध्या)

उबाठाचे खासदार फुटणार असल्याच्या आणि त्यांच्यासोबत गुप्त बैठक पार पडल्याच्या चर्चांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूर्णविराम दिला आहे. या बातम्या पूर्णपणे निराधार, खोडसाळ आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात उबाठा गटाचे काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असून लवकरच मोठे पक्षांतर होणार असल्याच्या वावड्या उठल्या होत्या. यावर भाष्य करताना शिंदे म्हणाले की, गेल्या दीड वर्षांपासून अशा प्रकारच्या बातम्या मुद्दाम पसरवल्या जात आहेत. परंतु, या बातम्यांमध्ये काडीचेही तथ्य नाही. केवळ राजकीय गैरसमज आणि सनसनाटी निर्माण करण्यासाठी अशा वावड्या उठवल्या जात आहेत.

**अशा प्रकारचे वृत्त पूर्णपणे निराधार**

शिंदे यांनी पुढे स्पष्ट केले की, अशी कोणतीही बैठक झालेली नाही आणि त्या केवळ अफवा आहेत. अशा प्रकारचे वृत्त पूर्णपणे निराधार असून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. या स्पष्टीकरणामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना आता पूर्णविराम मिळाला असून, खासदारांच्या कथित बंडाच्या वावड्या केवळ 'राजकीय स्टंट' असल्याचे समोर आले आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### चतुर्वेदींच्या खासदारकीवरुन नाराजी

मुंबई (दै. संध्या) : राज्यात पुन्हा एकदा ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाली असून त्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठ्या उलथापालथी सुरू होतील अशी चर्चा सुरू आहे. एकनाथ शिंदे यांनी हा दावा जरी फेटळला असला तरी शिवसेनेच्या केंद्रीय मंत्र्यांनी मात्र मोठा दावा केला आहे. ठाकरेंच्या खासदारांसोबत कोणतीही चर्चा झाली नाही, मात्र त्यांना चांगली वागणूक मिळत नाही असं केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले. ते खासदार कधी ना कधी आमच्याकडे येतीलच असा दावा त्यांनी केला. तसेच, या आधी प्रियंका चतुर्वेदी यांना खासदारकी दिल्यामुळे ठाकरेंचे खासदार आदित्य ठाकरेंवर नाराज होते असा दावाही त्यांनी केला.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, "ठाकरे गटाचे खासदारच नव्हे तर आमदारही अस्वस्थ आहेत. आमच्या तेव्हा काही तक्रारी होत्या, त्याच तक्रारी आज त्यांच्याकडील आमदार-खासदारांच्या आहेत. आम्हाला चांगली वागणूक मिळत नाही, आम्हाला कोणी विचारत नाही, लक्ष देत नाही हे दुःख आमच्याकडे ते व्यक्त करतात. आमचे मित्रच आहेत ते सगळे. आता मुख्य नेते एकनाथ शिंदे ठरवतील तेव्हा पुढचे पाऊल उचलले जाईल."

## चाकणकरांच्या बहिणीला नोटीस : संशयास्पद व्यवहाराप्रकरणी नोटीस

मुंबई (दै. संध्या)

शिर्डी पोलिसांनी भोंदू अशोक खरात प्रकरणाशी संबंधित असलेल्या समता पतसंस्थेतील संशयास्पद आर्थिक व्यवहाराप्रकरणी राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या भगिणी प्रतिभा चाकणकर यांना नोटीस बजावली आहे. यामुळे पोलिसांनी रुपाली चाकणकर यांच्या चौकशीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

भोंदू अशोक खरात प्रकरणात दररोज नवनवे खुलासे होत आहेत. या प्रकरणी खरातविरोधात शिर्डीत बेकायदा सावकारी व आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येथील समता पतसंस्थेत त्याच्याशी संबंधित अनेक संशयास्पद खाते आढळलेत. यात प्रतिभा चाकणकर व त्यांच्या मुलांच्या नावे असणाऱ्या 4 खात्यांचाही समावेश आहे. या खात्यांवरून तब्बल 2 कोटी 40 लाख रुपयांचा व्यवहार झाल्याची बाब पोलिस तपासात निष्पन्न झाली आहे. या आर्थिक व्यवहाराचा सावकारी व्यवसायाशी काही संबंध आहे का? तसेच हे पैसे कुणाचे आहेत? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पोलिसांनी प्रतिभा चाकणकर यांना नोटीस बजावली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, शिर्डी पोलिसांनी प्रतिभा चाकणकर यांच्या दोन वेगवेगळ्या पत्त्यांवर पोस्टाद्वारे नोटीस बजावली आहे. नोटीस मिळाल्यापासून 5 दिवसांच्या आत त्यांना चौकशी व जबाब नोंदवण्यासाठी शिर्डी पोलिस ठाण्यात हजर राहावे लागणार आहे.

## धनंजय मुंडेंना मंत्री केले, तर सत्ता जाणार : करुणा मुंडेंचा इशारा

मुंबई (दै. संध्या)

आमदार धनंजय मुंडे यांना मंत्री करण्यात आले तर महायुतीची सत्ता जाईल आणि तो पक्ष पुन्हा केव्हाही सत्तेत येणार नाही, असा इशारा धनंजय यांच्या पत्नी करुणा मुंडे शर्मा यांनी दिला आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताविषयी अद्याप गुन्हा दाखल झाला नाही. त्यांनाच या महाराष्ट्रात न्याय मिळणार नसेल, तर सर्वसामान्यांचे काय? असा सवाल उपस्थित करत करुणा यांनी यावेळी आपण दादांना न्याय मिळवून देण्यासाठी बारामतीची पोटनिवडणूक लढवत असल्याचेही जोर देऊन सांगितले. सत्ताधारी शिवसेनेचे ऑपरेशन टायगर नव्हे, तर ऑपरेशन मेंढी असल्याचेही त्या यावेळी म्हणाल्या.

करुणा मुंडे शर्मा या बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. या निमित्ताने पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी सत्ताधारी महायुतीला उपरोक्त इशारा दिला. त्या म्हणाल्या, वंजारी समाजाने आमदार धनंजय मुंडे यांना नाकारले आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा मंत्री केल्यास त्यांना मंत्री करणाऱ्या पक्षाची सत्ता जाईल. त्यानंतर तो पक्ष पुन्हा केव्हाही सत्तेत येणार नाही. हा एका स्त्रीचा शब्द आहे.

## पैसे नसतील तर लाडकी बहीण योजना बंद करा : न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले

मुंबई (दै. संध्या)

■ पेन्शनला पैसे नाहीत, पण योजनेसाठी कोट्यवधी?

राज्यातील महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संदर्भात मोठी घडामोड समोर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या योजनेवरून राज्य सरकारला तीव्र शब्दांत सुनावले आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन व इतर लाभ देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यास ही योजना बंद करण्याचा विचार करा, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. या टिप्पणीमुळे राज्याच्या आर्थिक धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ही सुनावणी एका निवृत्त महिलेच्या याचिकेवर झाली. मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या या महिलेने सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारे निवृत्तीवेतन आणि इतर लाभ न मिळाल्यामुळे न्यायालयात धाव घेतली होती. यावर पालिकेच्या वकिलांनी कोर्टात मांडले की, या लाभांसाठी आवश्यक निधी उपलब्ध नाही, कारण राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळत नाही. यावर न्यायालयाने कठोर शब्दांत प्रतिक्रिया देत सरकारच्या प्राधान्यक्रमांवर सवाल उपस्थित केला.

न्यायालयाने विचारले की, लाडकी बहीण योजनेसाठी 40 हजार कोटी रुपये खर्च करता, मग पेन्शनसाठी पैसे कसे नाहीत? सरकारच्या या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा परिस्थितीत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे. जर निधीची कमतरता असेल, तर अशा मोठ्या योजनांचा पुनर्विचार करावा, असेही न्यायालयाने सूचित केले. या वक्तव्यामुळे राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे.


दरम्यान, या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडत असल्याचेही समोर आले आहे. या योजनेअंतर्गत सुमारे 2 कोटी 43 लाख महिलांनी नोंदणी केली होती. प्रत्येक लाभार्थी महिलेला दरमहा 1,500 रुपये दिले जात असल्याने वार्षिक खर्च सुमारे 43,740 कोटी रुपयांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे राज्याच्या आर्थिक



संतुलनावर या योजनेचा परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

योजनेतील पारदर्शकतेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या पडताळणीत 71 लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे या महिलांना योजनेतून वगळण्यात आले. तसेच काही प्रकरणांमध्ये सरकारी कर्मचारी, तसेच महिलांच्या नावावर पुरुषांनीही लाभ घेतल्याचे आढळून आले. यामुळे योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी समोर आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने लाभार्थ्यांची सखोल पडताळणी सुरू केली आहे. पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम महिलांनाही योजनेचा लाभ मिळत असल्याचे आढळल्याने केवायसी मोहीम राबवण्यात आली. त्यामुळे मोठ्या संख्येने लाभार्थी कमी झाले आहेत. मात्र, न्यायालयाच्या निरीक्षणानंतर आता या योजनेबाबत सरकार काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

# ‘घोस्ट मर्मर’! ६४ किमीवरून ओळखली धडधड...

इराण-अमेरिका युद्धात इराणनं अमेरिकेचं विमान पाडल्यानंतर त्यातल्या वैमानिकाला अमेरिकन सैन्यानं थेट इराणच्या हद्दीत शिरून हुडकून काढलं आणि पहाडांमध्ये लपून बसलेल्या आपल्या या शूर वैमानिकाला वाचवलं.. ही बातमी एव्हाना जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. पण, एवढी धाडसी मोहीम अमेरिकेनं कशी फत्ते केली? आपल्या या वैमानिकाला त्यांनी नेमकं कसं वाचवलं? या बचावाच्या थराराची कहाणी आता व्हायरल झाली आहे. ही मोहीम खरोखरच अवघड होती. आपल्या एका जवानाला वाचवण्यासाठी अमेरिकेनं अक्षरश: लक्षावधी डॉलर्स तर खर्च केलेच; पण अति दुर्गम पहाडात लपून बसलेल्या या जवानाला वाचवण्यासाठी त्यांनी जे तंत्रज्ञान वापरलं, ते खरोखरच आपल्या हृदयाची धडधड वाढवणारं आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपल्या या सैनिकाला वाचवण्यासाठी नेमक्या याच धडधडीचा त्यांनी वापर केला. आपल्या एअरमनच्या हृदयाची धडधड थेट ४० मैल (सुमारे ६४ किलोमीटर) दूर अंतरावरून त्यांनी ऐकली, तो आपलाच जवान आहे, हे ओळखलं आणि मग त्याला वाचवण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली! पण, हे नेमकं घडलं तरी कसं? - अमेरिकेची प्रमुख गुप्तचर संस्था ‘सीआयए’नं त्यासाठी अशा एका तंत्रज्ञानाचा वापर केला, ज्यामुळे सगळ्या जगानं आश्चर्यानं तोंडात बोटं घातली. त्या उपकरणाचं नाव आहे, ‘घोस्ट मर्मर’! या तंत्रज्ञानाचं वैशिष्ट्य म्हणजे कित्येक किलोमीटर अंतरावरून एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या हृदयाची धडधड हे उपकरण ओळखू शकतं. त्यामुळेच हा एअरमन कुठे लपला आहे, तो कुठे आहे, हे कोणालाच माहीत नसताना, खुद्द इराणचे हजारो सैनिक आपल्याच भूमीत या जवानाचा शोध घेत असताना, त्यांना त्याचा पत्ता लागला नाही; मात्र, कित्येक किलोमीटर अंतरावरून अमेरिकेच्या तंत्रज्ञांनी आणि सैनिकांनी या जवानाच्या हृदयाची धडधड ऐकली, ते त्याच्यापर्यंत पोहोचले आणि त्यांनी त्याला वाचवलं! अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याच शब्दांत सांगायचं तर, अमेरिकेच्या इतिहासातील सर्वांत धाडसी शोध आणि बचाव मोहिमांपैकी एक म्हणून या घटनेची नोंद झाली आहे! न्यू यॉर्क पोस्ट आणि अमेरिकन न्यूज साइटच्या अहवालानुसार, हे तंत्रज्ञान लांब पल्ल्याच्या क्वान्टम मॅग्नेटोमेट्रीचा वापर करून माणसाच्या हृदयाच्या धडधडीच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक चिन्हांचा शोध घेतं आणि हा डेटा



एआय सॉफ्टवेअरला जोडून आसपासच्या अनेक आवाजांतून त्या विशिष्ट चिन्हाला वेगळं करतं. सोप्या भाषेत सांगायचं तर, ‘घोस्ट मर्मर’ अशा अतिशय सूक्ष्म इलेक्ट्रोमॅग्नेटिक सिग्नल्सचा शोध घेतं, जे माणसाच्या हृदयाच्या धडधडीतून दूरवर पसरतात. समजा एखाद्या भव्य स्टेडियममध्ये एखादी मॅच सुरू आहे. मॅच पाहण्यासाठी हजारो चाहते जमले आहेत. मॅच अतिशय रंगात आली आहे. प्रेक्षकही जल्लोष करताहेत; पण, या कोलाहलातील हजारो आवाजांमधून नेमका आवाज आणि नेमकी व्यक्ती शोधून काढण्यासारखंच हे आहे. तज्ज्ञांचं म्हणणं आहे, तुमचं हृदय जर धडधडत असेल, तर जगाच्या पाठीवर कुठूनही आम्ही तुम्हाला शोधून काढू! या मोहिमेनंतर पत्रकार परिषदेत सीआयएचे संचालक जॉन रॅटक्लिफ यांनी सांगितलं, अमेरिकेचा एक शूर सैनिक जिवंत आहे आणि पर्वतातील एका कपारीत लपलेला आहे हे आम्ही आधी शोधून काढलं! तो शत्रूच्या नजरेपासून दूर होता; पण, ‘सीआयए’च्या दृष्टीपासून नाही!..

## संस्कृत सुभाषित

विद्या नसे ज्या तप दान नाही । न ज्या गुण ज्ञान न शील काही
॥ न धर्म भूमिप्रति भारकारी । पशूच ते मानव देहधारी ॥

अर्थ : त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगीपणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

## गुरु वचन

### जर मनच अशुद्ध तर

खूप जुनी गोष्ट आहे. एकदा संत कबीर बसले होते. त्यांच्याकडे एक व्यापारी धावत आला. त्याने कबीरांना विनंती केली, ’मला तुम्हाला माझा गुरू करायचे आहे, तुम्ही मला गुरुमंत्र द्या’ तेव्हा संत कबीरांनी त्याला पैसे दिले आणि सांगितले आधी तू पटकन जाऊन दूध घेऊन ये, मग मी तुला गुरुमंत्र देतो.

त्या व्यापाऱ्याला खूप घाई होती. तो तडक धावत गेला आणि त्याने दूध कबीरांना आणून दिले. कबीरांनी त्याला एक भांडे दिले आणि सांगितले, हे दूध या भांड्यात ओत. त्याने ते भांडे घेतले, त्यात प्रचंड घाण साचली होती. त्या व्यापाऱ्याने कबीरांना ही बाब सांगितली. ते म्हणाले, बघ जर तू या खराब भांड्यात दूध टाकायला तयार नाहीस तर, मग मी तुझ्या अशुद्ध मनात राम नावाचा मंत्र कसा देऊ? ’

कबीरांनी म्हटलेले वाक्य किती खरे आहे बघा? जर तुमचे मनच शुद्ध नाही तर तुम्ही देवाचे दर्शन घेतले काय, किंवा संत सानिध्यात राहिलात काय, त्याचा काय परिणाम होणार?

संतांनीही हेच सांगितले आहे. भलेही तुम्ही पुजा नका करू, परंतु तुम्ही तुमचे आचरण, आणि मन शुद्ध ठेवा. आपण इतरांना एखाद्या कामासाठी दोष देत असतो, पण त्याची त्यामागची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. आणि आपण नेमके या उलटच करतो.

आपल्या दैनंदिन कामात आपण अनेकांना भेटत असतो, यात प्रत्येक व्यक्ती आपल्याला चांगलीच भेटते असे नाही, तर प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असून शकतो. त्यांच्या स्वभावानुसार त्यांना काम देणे गरजेचे आहे.

बदलायची असतील तर त्यांची मने बदलण्याचा प्रयत्न तुम्ही करा. त्यांच्या मनातील कटुता कमी करा. कारण कबीरांनी म्हटल्याप्रमाणे, खराब भांड्यात ज्या प्रमाणे तुम्ही दूध नाही टाकणार त्या प्रमाणेच एखाद्याचे मन परिवर्तन झाल्याशिवाय तुम्ही त्याला बदलू नाही शकणार.

## उपदेशकथा

### दुष्टावर विश्वास ठेवू नये

एका खुराड्यात काही कबुतरे होती. त्या कबुतरांच्या डोक्यावरून आकाशात एक घार फिरत होती. ती झडप घालून कबुतरांना ठार मारणार होती. त्यामुळे ती कबुतरे खूप घाबरली आणि जवळच्याच झाडावर बसलेल्या ससाण्याला म्हणाली, ‘तू किती शूर आहेस. तू आमचे या घारीपासून संरक्षण कर.’ससाणा म्हणाला, ‘त्यासाठी मला तुमच्या खुराड्यात येऊन बसावे लागेल. मी तिथे असताना घार तुमच्या केसालाही धक्का लावू शकणार नाही. कबुतरांनी सासण्याला खुरड्यात बसायला परवानगी दिली पण थोड्या वेळाने ससाण्याने कबुतरांना ठार मारण्याचा सपाटाच लावला. घारीने पंधरा दिवसात मारली नसतील एवढी कबुतरे ससाण्याने एका दिवसात ठार मारली. ते पाहून कबुतरांना फार पश्चाताप झाला आणि त्यांनी त्या ससाण्याला खुराड्यातून हाकलून दिले.

कथा उपदेश : दुष्ट माणसावर विश्वास ठेवू नये. एका शत्रूपासून जीव वाचवण्यासाठी दुसऱ्या शत्रूचा आधार घेतला तर प्रसंगी प्राणावर बेतते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | १३:३९:३६ |
| ११ एप्रिल २०२६ | योग:सिद्ध १८:३८:२३ |
| शनिवार | करण:तैतिल १२:०१:४२ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:गर २४:३७:५१+ |
| चैत्रशके संवत्– १९४८ | सूर्य:मीन |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मकर |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– चैत्र | मुस्लिम मास – शव्वाल |
| ऋतु– सौर वसंत | तारीख – २२ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:नवमी २४:३७:५१+ | महात्मा जोतिबा |
| नक्षत्र:उत्तराषाढा | फुले जयंती |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९१५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 4 | 3 | 5 | 2 | | | |
| | 5 | | 7 | 8 | | | 3 | |
| | 1 | | | 9 | | | | |
| 3 | 7 | 8 | | | | | | 6 |
| | | 9 | 2 | 6 | 7 | 8 | | |
| 2 | | | | | | 4 | 7 | 9 |
| | | | | 2 | | | 9 | |
| | 2 | | | 7 | 9 | | 4 | |
| | | | 4 | 1 | 3 | 6 | | 5 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९१४ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7 | 2 | 5 | 3 | 6 | 8 | 9 | 4 |
| 5 | 8 | 6 | 4 | 9 | 2 | 1 | 3 | 7 |
| 3 | 4 | 9 | 1 | 8 | 7 | 2 | 6 | 5 |
| 7 | 2 | 4 | 3 | 5 | 1 | 6 | 8 | 9 |
| 8 | 5 | 1 | 6 | 2 | 9 | 7 | 4 | 3 |
| 6 | 9 | 3 | 7 | 4 | 8 | 5 | 2 | 1 |
| 9 | 1 | 5 | 8 | 6 | 3 | 4 | 7 | 2 |
| 4 | 3 | 8 | 2 | 7 | 5 | 9 | 1 | 6 |
| 2 | 6 | 7 | 9 | 1 | 4 | 3 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२४१ – मोंगोल सरदार बाटु खान याने हंगेरीचा राजा बेला चौथा यास मोहीच्या लढाईत पराभूत केले.
- १८६८ – जपानमध्ये शोगन व्यवस्थेचा अंत.
- १८९९ – स्पेनने पोर्तोरिकोचा प्रांत अमेरिकेला दिला.
- १९४५ – दुसरे महायुद्ध – अमेरिकेच्या सैन्याने बुखेनवाल्ड कॉंसेन्ट्रेशन कॅम्प मधून कैद्यांची मुक्तता केली.
- १९५१ – कोरियन युद्ध – अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमनने जनरल डग्लस मॅकआर्थरकडून सरसेनापतीपद काढून घेतले.

### राष्ट्रीय

- २००६ – दिल्लीला लागून असलेल्या गुडगाव शहरातील कंपनीच्या कारखान्यात कायम सेवेत सामावून घेण्याची मागणीसाठी हिरो होंडा मोटर लि.चे ४ हजार दोनशे कामगारांनी संप पुकारला.
- २००७ – दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने जवळपास दोन कोटी रुपयांचे हेरॉईनसह दोन विदेशी नागरिकांना अटक केली.

### जन्म

- ०१४६ – सेप्टिमियस सेव्हेरस, रोमन सम्राटचा जन्म.
- १३५७ – होआव पहिला, पोर्तुगालचा राजाचा जन्म
- १७५५ – जेम्स पार्किन्सन, इंग्लिश डॉक्टरचा जन्म.
- १८२७ – महात्मा ज्योतीबा फुले,समाजसुधारक यांचा जन्म.

### निधन

- १०३४ – रोमानस तिसरा, बायझेन्टाईन स्राटचे निधन.
- १६१२ – इमॅन्युएल फान मेटरेन, फ्लेमिश इतिहासकाराचे निधन.
- २००७ – प्रख्यात कव्वाली गायक इकबाल साबरी यांचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले.

## : SMS :

Doctor: is dawaa ko ek hafte main poora khatm karo aur baad main aake milo.
Patient: teek hai doctor
(ek hafte ke baad)
Doctor: dawaa khatam huaa kya?
Patient: nahi doctor.
Doctor: kyu nahi?
Patient: usme likhaa thaa ke, bottle ko hamesha bandh rakhe.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| गोंदिया | ३५.४ | २५.३ |
| जळगाव | ३६ | २३.२ |
| कोल्हापूर | ३४.३ | १९.८ |
| लातूर | ३३.३ | २१.९ |
| मुंबई | ३४.७ | २९.२ |
| नागपूर | ३५ | २३.८ |
| नांदेड | ३५.४ | २३.४ |
| नंदूरबार | ३२.२ | २२.८ |
| नाशिक | ३२ | २१.९ |
| पुणे | ३२ | १८.८ |
| पंढरपूर | ३६.८ | २३.१ |
| सातारा | ३४.५ | १८.२ |
| सांगली | ३५.९ | २०.६ |
| सोलापूर | ३६.४ | २३.८ |
| वर्धा | ३६ | २३.५ |
| वाशिम | ३४.४ | २२.४ |
| यवतमाळ | ३५.५ | २३.३ |
| औरंगाबाद | ३२.९ | २१.६ |
| अहमदनगर | ३३.५ | २०.४ |
| अकोला | ३६.१ | २३.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष** : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर यश मिळाल्याने उत्साह वाढेल. श्रेष्ठ लोकांच्या भेटी होतील.

**तुळ** : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर तणावमुक्त झाल्यामुळे प्रसन्न वातावरण राहील. कार्याचा विस्तार वाढेल.

**वृषभ** : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पश्चिम आर्थिक फायदा मिळण्याचे योग आहेत. प्रयत्न केल्यानंतर अडचणी दूर होतील.

**वृश्चिक** : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पूर्व व्यक्तिगत कामात प्रगती होईल. संत लोकांचा सहवास मिळेल. आपल्या चांगल्या संबंधामुळे फायदा होईल.

**मिथुन** : शुभ रंग: गुलाबी,शुभ दिशा: उत्तर व्यापाराच्या विस्तारासाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**धनु** : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. आपली महत्वकांक्षा पूर्ण होईल. विरोधकांपासून सावधानी बाळगा.

**कर्क** : शुभ रंग :निळा,शुभ दिशा:पश्चिम नवीन संबंध प्रस्तापित होतील. आपला प्रभाव वाढल्याने विरोधक त्रस्त होतील.

**मकर** : शुभ रंग: लाल,शुभ दिशा: दक्षिण कौटुंबिक वातावरण उत्साहपूर्वक राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. आर्थिक योग चांगले आहेत.


**सिंह** : शुभ रंग: गुलाबी,शुभ दिशा: दक्षिण विरोधकांची हालचाली वाढतील. आर्थिक तणावामुळे कुटुंबात वाद होण्याची शक्यता.

**कुंभ** : शुभ रंग :लाल, शुभ दिशा : दक्षिण अगोदर केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसण्यास सुरूवात होईल. अडचणींवर मात कराल.

**कन्या** : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : दक्षिण मितभाषी राहिल्यामुळे आपणास अडचणींचा सामना करावा लागेल.

**मीन** : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर मुलांच्या कामा संदर्भात चांगली बातमी मिळेल. चैनीच्या वस्तु खरेदी करण्याचा योग आहे.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९१५



### आडवे शब्द

१. भारताचे माजी रेल्वेमंत्री
७. अकस्मात
९. दोन मैलांचे अंतर
११. प्रत्येक, शंकर
१२. प्रत्येक वर्षी
१४. पळून जाणे
१५. मोठे शहर, गाव
१६. कविता लिहणारा
१७. हट्टी
२०. फोडमधील द्रव
२१. रंग
२२. वारा, हवा
२३. कायदेशीर
२६. लाजीरवाणे
२७. हिचा ’एकच प्याला’ अनेक कुटुंबांची वाहताहत करणारा
२९. फोल, व्यर्थ
३०. कारस्थानी
३२. बेचव
३४. ’बहिरी’ शिकारी पक्षी
३६. मृत्यू नसलेला
३७. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
३८. नमस्काराचा एक शब्द
४१. पाप
४३. कोणत्याही गोष्टीतील ’अर्थ’ (ला.)
४४. बैठक
४५. प्रमाणपत्र
४६. छातीत होणारी आग
४७. मऊ
४८. खोकला
५१. श्रावणी शेंगभाजी
५१अ. अफवा, वावडी
५२अ. ’एअर इंडिया’चे बोधचिन्ह
५३. तारणहार
५४. परिचय
५६. क्रिकेटमधील शून्य (इंग्रजी)
५७. बाजू, पक्ष
५८. गावगप्पांचे ठिकाण
६०. पगार
६२. ओरखडा
६४. छोटे चर्मवाद्य
६६. कशा प्रकारचा
७०. मौज, गंमत
७०अ. दोन वेळा म्हटल्यास एक देशी खेळ
७१. एक द्विदल धान्य
७२. शर्करा
७३. बातमी (हिंदी)
७४. पावलाचा खालचा भाग
७६. लहान मूल
७८. केवड्याचे रान
७९. धुणे
८०. आवरणातील छोटासा तुकडा
८१. यथेच्छ

### उभे शब्द

१. संगोपन, २. तीन तास
३. तात्पर्य
४. आपसातील युद्ध
५. किंमत
६. वस्ती
८. चहा पिण्याचे जोडसाधन
९. कोकिळ (हिंदी)
१०. खळबळजनक
११. केसांची बट
१६. कान
१८. गंध
१९. केविलवाणा
२१. जेवणापूर्वी म्हणण्याचा श्लोक– ’--- नाम घ्या श्रीहरीचे’
२२. घोडा
२४. करुणा, कीव
२५. दागदागिने
२७. सेवक
२८. विजयादशमी
३१. पुन्हा
३३. फळातील द्रव
३५. चाणक्यनिती
३७. पंकज
३८. ढीग
३९. चिंतन
४०. कलावंत
४२. सत्व
४३. राजनीतीशी संबंधित
४४. बोंबाबोंब, हाकाटी
४९. समानता
५०. पटाईत, निष्णात
५२. कढी, मठ्ठा, लस्सी असे याचे कितीतरी प्रकार!
५५. जखमेवरचा पापुद्रा
५९. आश्चर्य
६१. नजरेचा पहारा
६३. श्रीरामाचे स्तोत्रकवच
६५. न्याहारी
६७. कणीदार
६८. कौशल्य
६९. वस्तू, माल
७४. शरीर
७५. रस्ता, मार्ग
७६. कठीण प्रसंग
७७. विडा

### जम्बो शब्दकोडे क्र. ९१४ चे उत्तर

आडवे उत्तर : २.खबरदारी ५.सवालजवाब ९.दुर्लक्षित १०.माह १२.दंड १४.रवा १६.कस्तुरीमृग १९.जादूगार २०.सनातनी २३.चकमक २४.टग्या २५.सागरतीर २९.जुने ३०.खीर ३१.तरु ३३.कृतज्ञ ३४.टवाळ ३६.अंगना ३९.मोकाट ४१.विटका ४२.सफरचंद ४५.सराईत ४८.अधिक ५०.बोट ५१.करुणा ५२.डाकू ५३.क्रोध ५४.बळकटी ५६.प्रथा ५८.अखिल ५९.दाटी ६०.संतापलेला ६२.दरा ६४.कलकत्ता ६६.खडूस ६८.आरव ६९.बट्टा ७१.जोक ७२.मलई ७५.कूपमंडूक ७७.कृश ७८.कर्नाटक ७९.रडराऊत

उभे उत्तर : १.दुर्लभ २.खतरनाक ३.रमा ४.दाहक ६.वादंग ७.लड ८.वावदूक ११.कैरी १३.धरणी १५.वात १७.स्तुती १८.मृदंग १९अ. पचका २०.समजूतदार २१.नीटनेटका २२.प्रीती २५.सार २६.रणांगण २७.रस्सा २८.अंत ३०.खीळ ३२.रुक्ष ३५.वाटसरु ३७.कंटक ३८.दासबोध ३९.मोद ४०.बाई ४१.विधिलिखित ४३.फट ४४.चंगळ ४६.राणा प्रताप ४७.तडा ४९.माधवराव पेशवे ५१.कटी ५४.बटीक ५५.कलंक ५७.थाप ६१.लेखक ६१अ.लाडू ६२.दर ६३.मुबलक ६५.लक्ष्य ६७.सम ६८.आई ७०.समंध ७१.जोकर ७३.लढाऊ ७४.भाट ७६.भात

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### राज्यात 1.91 लाख घरांवर सौर पॅनेल; पालिका, नगरपालिकांना 19 कोटींचे बक्षीस

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र सरकारच्या पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेने महाराष्ट्रात मोठी गती घेतली असून ३० जून २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, राज्यात एकूण १ लाख ९१ हजार ५८५ निवासी ग्राहकांनी सौर संच बसवले आहेत. या बदल्यात प्रत्येक सौर संचामागे केंद्र सरकारकडून राज्यातील या स्थानिक स्वराज्य संस्थांना (ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिका १ हजार रुपये याप्रमाणे एकूण १९ कोटी १५ लाख ८५ हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देणार आहे. त्यानुसार पुणे जिल्ह्याला १ कोटी ३८ लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. सर्वाधिक ३ कोटी रुपयांचे अनुदान नागपूर जिल्ह्याला देण्यात येणार आहे. दरमहा ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या कुटुंबांना शून्य वीजबिलाचा फायदा मिळावा यासाठी केंद्र सरकारची प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना देशभर प्रभावीपणे राबविली जात आहे. या योजनेंतर्गत छतावर सूर्यघर प्रकल्प बसविण्यासाठी वीजग्राहकांना ३ किलोवॅटसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान मिळते. तर प्रकल्प बसवण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत विनातारण आणि कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध. याच योजनेला स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रोत्साहन द्यावे याकरिता प्रति सूर्यघराकरिता १ हजार रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे.



### कारवाईच्या नादात केबल खोदाईचे प्रस्ताव रखडले

पुणे (दैनिक संध्या) : महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी प्रशासनाने शहरातील बेकायदेशीर ओव्हरहेड केबलवर जोरदार कारवाई सुरू केली आहे. मात्र, या कारवाईच्या नादात मोबाईल कंपन्यांनी केबल टाकण्यासाठी महापालिकेकडे दिलेले रस्ते खोदाईच्या परवानगीचे प्रस्ताव रखडल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्या आदेशानुसार प्रशासनाने शहरातील अनधिकृत ओव्हरहेड केबल विरोधात कारवाईची मोहीम उघडली आहे. या कारवाईत मोठ्या कंपन्यांबरोबरच छोट्या केबल व्यावसायिकांच्या केबलवरही कारवाई करण्यात येत आहे. महापालिकेने ओव्हरहेड केबल अधिकृत करण्याबाबत कोणतेही धोरण न करताच ही कारवाई सुरू केली असून, त्यावरून सत्ताधारी भाजपसह प्रशासनात मतभेद आहेत. त्यातच आता अनेक मोबाईल कंपन्यांनी त्यांच्याकडील केबल भूमिगत पद्धतीने टाकण्यासाठी महापालिकेकडे दाखल केलेले प्रस्ताव मंजूर केले नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे एकीकडे प्रशासन भूमिगतसाठी मंजुरी देत नाही आणि दुसरीकडे मात्र ओव्हरहेड केबलवर कारवाई केली जात आहे, अशा दुहेरी कात्रीत कंपन्या सापडल्या आहेत.




### स्वारगेट-कात्रज भुयारी मेट्रो कामाला वेग; टीबीएम शाफ्ट खोदकाम सुरु

पुणे (दैनिक संध्या) : स्वारगेट-कात्रज भुयारी मेट्रो मार्गाच्या प्रत्यक्ष कामाला आता सुरुवात झाली असून, टीबीएम (टनेल बोरिंग मशीन) लॉन्चिंगकरिता शाफ्ट (खड्डे) खोदण्याचे काम स्वारगेट येथे वेगाने सुरू झाले आहे. शाफ्टचे खोदकाम पूर्ण झाल्यावर लवकरच हे टीबीएम स्वारगेट येथे जमिनीखाली उतरविण्यात येणार आहे. अन् त्याद्वारे कात्रजच्या दिशेने भूमिगत मार्गाचे खोदकाम करण्यास सुरुवात होणार आहे. अखेर या कामाने आता पहिल्या टप्प्यासाठी वेग घेतला असून, या मार्गावरील भूमिगत स्थानकांच्या कामासाठी स्वारगेट येथे शाफ्टच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे स्वारगेट ते कात्रज मार्ग सुरू झाल्यावर पुण्यातील वाहतुकीवर सकारात्मक परिणाम होणार असून, हा भुयारी मेट्रो मार्ग कधी होणार, याची पुणेकरांना उत्सुकता लागली आहे. स्वारगेट-कात्रज हा मेट्रो मार्ग पूर्णतः भूमिगत असणार आहे. पर्पल मार्गिकेतील 5.46 किमीची विस्तारित मार्गिका आहे. नियोजित सर्व भूमिगत स्थानकांचा समावेश असणार आहे. यात मार्केट यार्ड, बिबवेवाडी, बालाजीनगर आणि कात्रज उपनगरे यांसारख्या प्रमुख क्षेत्रांना जोडण्यात येणार आहे. या मार्गामुळे आगामी काळात मेट्रोने थेट कात्रजहून निगडीपर्यंत प्रवास करता येणार आहे. स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गिकेसाठी आवश्यक असलेले शाफ्टचे काम आम्ही सुरू केले आहे. हा प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असला, तरी आधुनिक यंत्रसामग्रीच्या मदतीने आम्ही तो वेगाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. कोणत्याही परिस्थितीत हे काम नियोजित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, जेणेकरून पुणेकरांना लवकरच या मार्गावर मेट्रो सेवा उपलब्ध होईल.

### कांद्याचे भाव कोसळले; पुणेतील शेतकरी आर्थिक संकटात

पुणे (दैनिक संध्या) : पूर्व भागात सध्या कांदा काढणी सुरू असून, बाजारभाव घसरल्याने शेतकरी हताश झाला आहे. गोळे कांद्याला 10 किलोस 120 ते 125 रुपये, कांदे 80 ते 115 रुपये, गोटी कांदा 40 ते 75 रुपये, तर बदला कांदा 15 ते 35 रुपये दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे लोणी, धामणी, लाखणगाव, पोंदेवाडी, जारकरवाडी परिसरातील शेतकरी सध्या कांदा विक्री न करता कांदा चाळीत साठवून ठेवण्याकडे वळले आहेत. इंधन दरवाढीसह मजुरी, मशागत, खते आणि औषधांच्या किमतीत मोठी वाढ झाल्याने यंदा उत्पादन खर्च गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाला आहे.

# 'ससून'चा अजब कारभार...! मृताची माहितीच गायब

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालयातील प्रशासनाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. ससून प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या मृत्यू दाखल्यांवर मृताचा पत्ता, वय, लिंग आणि आधार कार्ड यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या नोंदीच गायब असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. रुग्णालयाच्या या गलथान कारभारामुळे आधीच दुःखात असलेल्या नातेवाइकांना आता सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असून, मनस्ताप सहन करावा लागत आहे.



**काय आहे नेमका प्रकार ?**

मिळालेल्या माहितीनुसार, २७ जानेवारी २०२६ रोजी ससून रुग्णालयात उपचार घेत असताना एका ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला होता. त्यावेळी प्रशासनाने नातेवाइकांकडून आधार कार्ड, रेशन कार्ड आणि इतर सर्व आवश्यक कागदपत्रे जमा करून घेतली होती. मात्र, दोन महिन्यांनंतर जेव्हा नातेवाईक वॉर्ड क्रमांक १०० (मृत्यू दाखला विभाग) मध्ये दाखला घेण्यासाठी गेले, तेव्हा त्यांना मिळालेल्या दाखल्यावर केवळ मृत महिलेचे नाव होते. पत्ता, वय, आई-वडिलांचे नाव आणि जोडीदाराचे नाव यांसारखे रकाने चक्क कोरे होते.

**पुणेकरांची मागणी**

रुग्णालय अधीक्षकांनी कारवाईचे आश्वासन दिले असले, तरी रोज शेकडो नागरिकांना या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने या 'आंधळ्या कारभारा'त तत्काळ सुधारणा करावी, अशी मागणी पुणेकरांकडून केली जात आहे.

**दुरुस्तीची प्रक्रिया म्हणजे 'डोक्याला ताप'**

प्रशासनाच्या चुकीमुळे मिळालेला हा अपूर्ण दाखला दुरुस्त करणे म्हणजे नातेवाइकांसाठी मोठा अडथळा ठरत आहे. दुरुस्तीसाठी पुन्हा अर्ज करणे, संबंधित वॉर्डातील डॉक्टरांकडून माहिती प्रमाणित करणे आणि त्यानंतर अधीक्षक कार्यालयाची मंजुरी मिळवणे, अशी किचकट प्रक्रिया नातेवाइकांना सांगितली जात आहे. स्वतःच्या चुकांचा भुर्दंड ससून प्रशासन सामान्यांना का देत आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

शासनाच्या आणि पालिकेच्या फॉरमॅटनुसारच प्रमाणपत्र दिले जाते. जर माहिती भरूनही ती छापून येत नसेल, तर ही बाब गंभीर आहे. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन तांत्रिक अडचण सोडविली जाईल.- डॉ. यल्लाप्पा जाधव, अधीक्षक, ससून रुग्णालय

**'उद्या या' म्हणत बोळवण**

जेव्हा नातेवाइकांनी या अपूर्ण माहितीबाबत कर्मचाऱ्यांना जाब विचारला, तेव्हा 'मॅडम सुट्टीवर आहेत, उद्या या,' अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. विशेष म्हणजे, या अर्धवट दाखल्यासाठी प्रशासनाने ५० रुपयांची पावतीही फाडली होती. कर्मचाऱ्यांच्या या असंवेदनशील वागणुकीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**ऑनलाइनचा फज्जा ?**

मृत्यू नोंदीची प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. मृत्यू झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत सर्व माहिती पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य असते. मात्र, ससूनमध्ये कर्मचारी माहिती भरण्यास टाळाटाळ करीत आहेत. शासनाच्या ऑनलाइन प्रणालीत तांत्रिक बिघाड आहे.

## कात्रज-कोंढवा रस्त्याच्या भूसंपादनाची फाईल महसूलमंत्र्यांकडे

पुणे (दै. संध्या)

बहुचर्चित कात्रज-कोंढवा रस्त्याच्या सक्तीच्या भूसंपादनाची फाईल महसूलमंत्र्यांच्या कार्यालयाकडे आहे. येत्या काही दिवसांत भूसंपादनाला मान्यता मिळेल, असा विश्वास शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी व्यक्त केला आहे.

कात्रज-कोंढव्यापासून मंतरवाडीपर्यंतचा राष्ट्रीय महामार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु अरुंद रस्ता आणि दोन्ही बाजूंना लोकवस्ती वाढल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होते. ही वाहतूककोंडी सोडवण्यासाठी महापालिकेने कात्रज येथील राजस सोसायटी चौक ते कोंढवा खडी मशीन चौकादरम्यानच्या साडेतीन कि.मी. लांबीच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. परंतु अगोदर निविदांमधील अडचणी आणि नंतर भूसंपादनातील अडचणींमुळे या रस्त्याचे काम अनेक वर्षे रेंगाळले आहे.सध्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूककोंडी होत असून, नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागतो. हा रस्ता अरुंद असल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.



त्यामुळे हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतूककोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

त्यामुळे रस्त्याचे भूसंपादन वेळेत व्हावे, यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले जात आहेत. या अनुषंगाने भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी आणि महापालिका यांनी याविषयी वारंवार बैठक झाल्यानंतर १५ मार्चपर्यंत कात्रज-कोंढवा रस्त्याचे भूसंपादन होईल, अशी अपेक्षा होती. मात्र अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे गेल्याने अद्याप भूसंपादनाचा प्रश्न सुटलेला नाही.

याविषयी पावसकर म्हणाले, महसूलमंत्री यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये कात्रज-कोंढव्याच्या भूसंपादनाचा विषय निघाला होता. येत्या काही दिवसातच प्रस्तावाला मान्यता मिळेल, असे आश्वासन महसूलमंत्र्यांनी दिले आहे. सुमारे ३.५ ते ४ किलोमीटर लांबीच्या या रस्त्याच्या विकासासाठी जवळपास २७ हेक्टर जमीन आवश्यक आहे. काही ठिकाणी नागरिकांच्या हरकतींमुळे प्रक्रिया रखडली होती; मात्र आता आवश्यकतेनुसार सक्तीच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## पाताळेश्वर लेणीतील नंदी मंडपाची दुरुस्ती; 60 लाखांचा निधी मंजूर

पुणे (दै. संध्या)

पाताळेश्वर लेणीसमोरचा भव्य नंदी मंडप जर्जर झाला आहे. मोठ्या पाठपुराव्यानंतर अखेर त्याची दुरुस्ती होणार असून, मोडकळीस आलेले छत, चिरा पडलेले दगडी खांब याची शास्त्रीय पद्धतीने डागडुजी होणार आहे. त्यासाठी 60 लाख रुपये खर्च मंजूर झाला आहे. अभियांत्रिकी गणित करून छताचा भार अभ्यासण्यात आला आहे. चालू आर्थिक वर्षात हे काम पूर्ण होणार आहे.

केंद्रीय पुरातत्व विभागाचे राज्यात तीन विभाग आहेत. यात पुणे हे मुंबई विभागात येते. पाताळेश्वर लेणी ही मुंबईच्या अखत्यारित येते. या लेणीविषयी स्पष्ट शिलालेख किंवा ऐतिहासिक पुरावे नसले, तरी ही लेणी राष्ट्रकुट राजवंशाच्या काळात तयार केली असावी, असे इतिहासकार सांगतात. लेणीतील महादेव मंदिरासमोरील मोकळ्या पटांगणात भव्य नंदी मंडप असून, तोच या मंदिराचे आकर्षण आहे. एकूण 16 खांबांवर भव्य छत असून, गोलाकार पद्धतीने हा नंदी मंडप तयार केला आहे. इसवि 750 (8 वे शतक) मध्ये ही लेणी कोरली गेली असावी, असा अंदाज आहे. छताचा 16 खांबांवर पडणारा भार कमी कसा करता येईल, याचा अभियांत्रिकी पद्धतीने अभ्यास करीत आहोत. प्रथम हा मंडप स्वच्छ करून मग त्याच्या डागडुजीचे काम केले जाणार आहे. एकूण 60 लाख रुपये खर्च अपेक्षित असून, त्याला मंजुरी मिळाल्याने हे काम चालू आर्थिक वर्षात पूर्ण केले जाणार आहे.

## साहित्य परिषदेच्या महत्त्वपूर्ण फाइलींचे गुपचूपपणे ‘हस्तांतरण

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये झालेल्या सत्तांतरानंतर माजी पदाधिकाऱ्यांनी विद्यमान पदाधिकाऱ्यांशी विसंवादाचा पवित्रा घेतला आहे. परिषदेच्या कार्यभार हस्तांतरित करण्याची प्रक्रिया अधिकृतपणे न राबविता परिषदेच्या महत्त्वाच्या फाइली कुणालाही कल्पना न देता गुपचूपणे हस्तांतरित केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.

गेल्या दहा वर्षांपासून सत्तेत असलेले दोन माजी पदाधिकारी चार दिवसांपूर्वी अचानक परिषदेत आले. त्यांनी कोणालाही न कळू देता आणि न कळविता दहा ते पंधरा महत्त्वाच्या फाइली एका महिला कर्मचाऱ्याकडे सुपुर्द केल्याचे सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या हालचालीची विद्यमान पदाधिकाऱ्यांना माहितीच नव्हती. मुळात परिषदेच्या अधिकृत फाइली बाहेर कशा गेल्या? त्या आतापर्यंत कुठे होत्या? आणि त्या अशा पद्धतीने गुपचूप का दिल्या गेल्या? असे सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहेत. सध्या या फाइलींची तपासणी सुरू असून, संबंधित माजी पदाधिकाऱ्यांकडून याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात येणार आहे.

‘साहित्य संवर्धन आघाडी’ने विजय मिळवत ‘परिवर्तन उत्कर्ष आघाडी’चा पराभव केला. या पराभवाचा माजी पदाधिकाऱ्यांना मोठा धक्का बसल्याची चर्चा आहे. निवडणुकीपूर्वी २६ मार्च रोजी जुन्या कार्यकारिणीने बैठक घेतली होती. नियमानुसार नव्या कार्यकारिणीला बैठकीसाठी निमंत्रित करणे अपेक्षित असताना तसे झाले नाही. त्यानंतर १ एप्रिल रोजी नव्या कार्यकारिणीने पदभार स्वीकारला; मात्र, माजी पदाधिकाऱ्यांकडून महत्त्वाची कागदपत्रे, आर्थिक हिशेब, बँक व्यवहार आणि ठेवी असा कार्यभार प्रत्यक्षात हस्तांतरित करण्यात आलेला नव्हता. त्यावर उत्तर देताना माजी प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार यांनी मतमोजणीतील गैरप्रकारांविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याचे कळविले होते. नव्या कार्यकारिणीला पदभार स्वीकारण्यास स्थगिती द्यावी, अशी मागणीही करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. त्यामुळे माजी पदाधिकाऱ्यांना विद्यमान पदाधिकाऱ्यांकडे कार्यभार हस्तांतरित करणे भाग होते. नव्या पदाधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीचा फायदा घेत माजी पदाधिकारी परिषदेत आले आणि गुपचूप फाइली हस्तांतरित केल्याची माहिती मिळाली आहे.

# पुणे महापालिकेत महिला उपायुक्तांना शिवीगाळ; गुन्हा दाखल

पुणे (दै. संध्या)

महापालिकेच्या मुख्य इमारतीत एका महिलेने महिला उपायुक्तांच्या दालनात घुसून त्यांना शिवीगाळ केल्याची घटना बुधवारी (दि. ८) दुपारी घडली. या प्रकारामुळे महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी संबंधित महिलेविरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कविता पटेकर (रा. मांगडेवाडी, कात्रज) असे गुन्हा दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत महापालिका कर्मचारी राकेश विटकर (५३) यांनी फिर्याद दिली आहे. बुधवारी दुपारी दीडच्या सुमारास ही घटना घडली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे महापालिकेच्या सांस्कृतिक, क्रीडा व सुरक्षा विभागाच्या उपायुक्त आशा राऊत या आपल्या दालनात शासकीय कामकाज पाहत होत्या. यावेळी संशयित आरोपी महिला पटेकर हिने कोणत्याही पूर्वपरवानगीशिवाय राऊत यांच्या दालनात प्रवेश केला. दालनात शिरल्यानंतर महिलेने उपायुक्तांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

मोठ्या आवाजात आरडाओरडा आणि अरेरावीची भाषा वापरत तिने कार्यालयातील शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. या गोंधळामुळे विभागातील इतर कर्मचाऱ्यांचीही धावपळ उडाली आणि काही काळ कार्यालयीन कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते. गोंधळ सुरू असतानाच, संशयित आरोपी महिलेने आपल्या मोबाईलवर या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ चित्रित केला.

हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून महिला अधिकाऱ्याची आणि पालिकेची बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याचा ठपकाही तिच्यावर ठेवण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांनी घटनास्थळी भेट दिली.

## महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

पुणे (दै. संध्या)

पुणे कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा वॉटर फिल्टरला विजेचा धक्का लागून झालेल्या मृत्यूच्या घटनेने राज्यभरात संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणातील दोषींवर तत्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी कृषी पदवीधर संघटनेने केली आहे. अन्यथा महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद (एमसीएईआर) कार्यालयावर तीव आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. चैतन्य कुंडलिक चव्हाण (वय 23, रा. डोंगरगण, ता. आष्टी, जि. बीड) हा पुणे कृषी महाविद्यालयात ‘ॲग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंट’ प्रथम वर्षात शिक्षण घेत होता. दि. 14 मार्च रोजी रात्री मेसमधील वॉटर फिल्टरचा वापर करताना त्याला विजेचा तीव धक्का बसला.

# जि. प. पहिली इंग्रजी माध्यमाची आंतरराष्ट्रीय शाळा

पुणे (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचा ड्रीम प्रोजेक्ट ठरलेली पुरंदर तालुक्यातील खानवडी येथील ‘ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळा’ अखेर प्रत्यक्षात साकारत असून, येत्या ११ एप्रिल रोजी या शाळेची पहिली घंटा वाजणार आहे. जिल्हा परिषदेची ही पहिली इंग्रजी माध्यमाची आणि केंद्रीय बोर्डावर आधारित ग्रामीण भागातील आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा ठरणार आहे.




या शाळेच्या उद्घाटनाची घोषणा जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत वाघमारे, आदी उपस्थित होते. महात्मा जोतिबा फुले यांच्या १९९व्या जयंतीनिमित्त आणि त्यांच्या २००व्या जयंती वर्षाच्या प्रारंभदिनी हा सोहळा पार पडणार असल्याचे जगदाळे यांनी सांगितले. या शाळेत बालवाडी ते इयत्ता बारावीपर्यंत सीबीएसई अभ्यासक्रमावर आधारित शिक्षण दिले जाणार आहे.

डिजिटल शिक्षणपद्धती, सुसज्ज प्रयोगशाळा, आधुनिक ग्रंथालय, क्रीडा सुविधा यांसह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी खानवडी येथे सुमारे १२ एकर गायरान जमीन राज्य सरकारने जिल्हा परिषदेला वर्ग केली आहे.

या शाळेमुळे परिसरातील दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना दर्जेदार अनिवासी शिक्षणाची संधी मिळणार आहे. तसेच, जिल्ह्यातील हुशार व गरजू विद्यार्थ्यांसाठी सहावीपासून निवासी सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून शाळेची सुरुवात होत असून, पहिल्या टप्प्यात बालवाडी ते इयत्ता दुसरीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. या टप्प्यात सुमारे २६० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून, ही व्यवस्था पूर्णतः अनिवासी असेल. पुढील वर्षापासून इयत्ता सहावीपासून निवासी शाळा सुरू करण्याचे नियोजन आहे.

या शाळेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, उपमुख्यमंत्री तसेच राज्यातील अनेक मंत्री या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षणाची नवी दारे उघडणारा हा प्रकल्प ठरणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### आशियातील टॉप-50 रेस्टॉरंट्समध्ये भारताची दोन 'रत्न'

मुंबई (दैनिक संध्या) : जगभरातील खवय्यांचे लक्ष लागून असलेल्या 'आशियातील ५० सर्वोत्तम रेस्टॉरंट्स २०२६' ची घोषणा झाली असून, भारतासाठी ही अभिमानाची गोष्ट ठरली आहे. या प्रतिष्ठित यादीत भारतातील दोन रेस्टॉरंट्सनी मानाचे स्थान मिळवले आहे. मुंबईतील 'मस्क' हे रेस्टॉरंट १५ व्या क्रमांकावर झळकले आहे, तर हिमाचल प्रदेशमधील 'नार' या रेस्टॉरंटने ३० व्या क्रमांकावर झेप घेत यादीत दिमाखात पदार्पण केले आहे. मुंबईतील एका जुन्या कापड गिरणीच्या परिसरात वसलेले 'मस्क' हे रेस्टॉरंट गेल्या पाच वर्षांपासून भारतातील सर्वोत्तम रेस्टॉरंट ठरले आहे. २०१६ मध्ये आदिती दुगर यांनी याची स्थापना केली. सध्या शेफ वरुण तोतलानी हे या स्वयंपाकघराचे नेतृत्व करत आहेत. विशेष म्हणजे, येथे कोणतेही पारंपरिक मेनू कार्ड नसते. ऋतूंनुसार बदलणारा १० पदार्थांचा टेस्टिंग मेनू हे येथील वैशिष्ट्य आहे. या खास मेजवानीसाठी एका व्यक्तीला अंदाजे ८,०८५ रुपये (कर वगळून) मोजावे लागतात. यंदाच्या यादीत हाँगकाँगच्या 'द चेअरमन' या रेस्टॉरंटने आशियातील सर्वोत्तम रेस्टॉरंटचा मान पटकावला आहे. २०२१ नंतर दुसऱ्यांदा या हॉटेलने अव्वल स्थान गाठले आहे. याव्यतिरिक्त बँकॉकचे 'गगन' आणि सोलचे 'मिंगल्स' यांसारख्या प्रसिद्ध रेस्टॉरंट्सनी पहिल्या १० मध्ये स्थान मिळवले आहे. आशियातील खाद्यक्षेत्रात आपली ओळख निर्माण करण्यासाठी हे रँकिंग अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.



### 406 टन वजनाची ट्रेन ओढणारी कार

मुंबई (दैनिक संध्या) : एका दणकट कारने थोडी थोडकी नव्हे तर ४०६ टन वजनाची पॅसेंजर ट्रेन ओढून दाखविली आहे. यामुळे ऑटोमोबाईल विश्वात खळबळ उडाली आहे. JSW MG Motor India ची येऊ घातलेली ऑफरोडिंग एसयुव्ही MG Majestorने ही ताकद दाखविली आहे. भारताची पहिली 'D+' सेगमेंटची एसयूव्ही मानल्या जाणाऱ्या MG Majestor ने चक्क ४०६.४ टन वजनाची अवजड ट्रेन ३०० फूट अंतर खेचून एक नवा 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' (प्रस्थापित केला आहे. कोणत्याही एसयूव्हीने रेल्वेच्या रुळावर इतकी प्रचंड वजनाची ट्रेन खेचण्याची ही पहिलीच वेळ आहे. कुठे आणि कसा झाला हा विक्रम? हा थरारक प्रयोग जम्मू-काश्मीरमधील काकापोरा आणि अवंतीपोरा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान पार पडला. या विक्रमासाठी वापरलेल्या ट्रेनमध्ये एक WAG-9HC इंजिन, प्रवासी डबे आणि गार्ड डब्याचा समावेश होता, ज्याचे एकूण वजन ४०६ टन पेक्षा जास्त होते. MG Majestor ने ही ट्रेन ३०० फुटांपर्यंत खेचून ४०० टन आणि १०० फुटांचा जुना जागतिक विक्रम मोडीत काढला. विशेष म्हणजे, या विक्रमासाठी गाडीच्या इंजिनमध्ये कोणताही तांत्रिक बदल करण्यात आला नव्हता. ही एक सामान्य स्टॉक गाडी होती. यामध्ये २.० लिटरचे ट्विन टर्बो डिझेल इंजिन आहे, जे २१५.५ PS पॉवर आणि ४७८.५ Nm टॉर्क जनरेट करते. ऑटोमोबाईल तज्ज्ञांच्या देखरेखीखाली हा प्रयोग करण्यात आला, जेणेकरून गाडीला बाहेरून कोणतीही मदत मिळणार नाही याची खात्री करण्यात आली. एमजीची ही मॅजेस्टर येत्या काही दिवसांत भारतात लाँच होत आहे. खासकरून ऑफरोडिंगसाठी ही एसयुव्ही बनविण्यात आली आहे. असे असले तरी तिचा लूक भारतीय रस्त्यांवर धावण्यासाठी देखील तयार करण्यात आला आहे.



### ₹2 च्या खाली आलेला अनिल अंबानींचा हा शेअर; अवघ्या सात दिवसांत 25% वाढला

मुंबई (दैनिक संध्या) : निल अंबानी यांच्या मालकीच्या Reliance Power या कंपनीच्या शेअरमध्ये अलीकडच्या काही दिवसांत लक्षणीय तेजी पाहायला मिळत आहे. शुक्रवारी (१० एप्रिल १०२६) बीएसईमध्ये इंट्राडे दरम्यान कंपनीचा शेअर सुमारे ४ टक्क्यांनी वाढून २५.६८ रुपयांवर पोहोचला. गेल्या ५ दिवसांत कंपनीच्या शेअरमध्ये सुमारे १५ टक्क्यांची वाढ झाली आहे. तसेच, मागील ७ ट्रेडिंग सत्रांत हा शेअर २५ टक्क्यांपेक्षा अधिक वाढला आहे. ३० मार्च २०२६ रोजी २०.२३ रुपयांवर ५२ आठवड्यांतील नीचांकी स्तर गाठल्यानंतर या शेअरमध्ये जलद पुनरागमन झाले आहे. सध्या कंपनीचे मार्केट कॅप १०,५०० कोटी रुपयांहून अधिक झाले आहे. रिलायन्स पॉवरचा शेअर एकेकाळी ११ फेब्रुवारी २००८ रोजी ५३८ रुपयांवर पोहोचला होता. मात्र त्यानंतर दीर्घकाळ घसरण सुरू राहिली आणि २७ मार्च २०२० रोजी तो अवघ्या १.१५ रुपयांवर आला. या नीचांकी पातळीवरून शेअरमध्ये तब्बल ५८०० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. तरीही, मागील ५-६ महिन्यांत पुन्हा काही प्रमाणात विक्रीचा दबाव दिसून येतोय. दरम्यान, रिलायन्स पॉवरने आपल्या गुंतवणूकदारांना बोनस शेअर्सही दिले आहेत. मे २००८ मध्ये कंपनीने ३:५ या प्रमाणात बोनस शेअर्स जाहीर केले होते, म्हणजेच प्रत्येक ५ शेअर्समागे ३ बोनस शेअर्स देण्यात आले होते.

# मालेगाव स्फोटातून मुक्तता; पुरोहितांचे मोठे प्रमोशन

## कर्नल श्रीकांत पुरोहित यांना भारतीय लष्करात मोठी बढती; 'ब्रिगेडियर' पदावर पदोन्नत करण्यास मंजुरी

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी प्रदीर्घ कायदेशीर लढा देणारे कर्नल श्रीकांत पुरोहित यांना भारतीय लष्करात मोठी बढती मिळाली आहे. सशस्त्र बल न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालानंतर लष्कराने त्यांना 'ब्रिगेडियर' पदावर पदोन्नत करण्यास मंजुरी दिली आहे. कर्नल पुरोहित ३१ मार्च २०२६ रोजी लष्करी सेवेतून निवृत्त होणार होते, मात्र त्यांच्या निवृत्तीला आता स्थगिती देण्यात आली आहे.

२००८ च्या मालेगाव स्फोट प्रकरणात नाव आल्यानंतर कर्नल पुरोहित यांचे लष्करी करिअर पूर्णपणे ठप्प झाले होते. ९ वर्षे तुरुंगात काढल्यानंतर २०१७ मध्ये त्यांना जामीन मिळाला आणि ते पुन्हा लष्करात रुजू झाले. मात्र, त्यांच्या बढतीचा आणि सेवाज्येष्ठतेचा प्रश्न प्रलंबित होता. जुलै २०२५ मध्ये मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाने त्यांची सर्व आरोपांतून मुक्तता केली. यानंतर सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांना 'कर्नल' पदावर बढती मिळाली होती.

कर्नल पुरोहित यांनी आपल्या ज्युनिअर अधिकाऱ्यांच्या बरोबरीने प्रमोशन आणि इतर फायदे मिळावेत यासाठी सशस्त्र बल न्यायाधिकरणाकडे दाद मागितली होती. जस्टिस राजेंद्र मेनन यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने १६ मार्च २०२६ रोजी निकाल देताना म्हटले की, "पुरोहित यांचा पदोन्नतीवर असलेला दावा न्याय्य आहे." त्यांच्या तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्यांची निवृत्ती स्थगित ठेवण्याचे आदेशही न्यायाधिकरणाने दिले होते.

भारतीय लष्कराच्या सूत्रांनुसार, ही बढती म्हणजे कर्नल पुरोहित यांच्या तुरुंगवास आणि खटल्यादरम्यान वाया गेलेल्या वर्षांची एक प्रकारे भरपाई आहे. जर त्यांची कारकीर्द व्यत्ययाविना सुरू राहिली असती, तर आज ते मेजर जनरल पदापर्यंत पोहोचले असते. आता ब्रिगेडियर म्हणून ते एका वरिष्ठ कमांडरच्या जबाबदारीत पुन्हा एकदा सक्रिय होतील.



## बीएसएनएल पुन्हा मार्केटमध्ये परतली...! Jio आणि Airtel ला टाकलं मागे; ठरली देशातील नंबर-१ कंपनी

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

एकेकाळी 'सरकारी' म्हणून दुर्लक्षित राहिलेली भारत संचार निगम लिमिटेड आता खासगी टेलिकॉम कंपन्यांना घाम फोडताना दिसत आहे. इंटरनेट गुणवत्तेच्या बाबतीत BSNL ने रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल यांसारख्या बलाढ्य कंपन्यांना मागे टाकत २०२६ च्या आर्थिक वर्षात देशातील नंबर-१ फिक्स्ड-लाइन ऑपरेटरचा मान मिळवला आहे. फ्रान्सच्या 'nPerf' या नेटवर्क टेस्टिंग कंपनीच्या ताज्या अहवालातून ही धक्कादायक आणि कौतुकास्पद माहिती समोर आली आहे.

इंटरनेटची गुणवत्ता मोजण्यासाठी nPerf 'nPoints' नावाचा स्कोअर वापरते. यामध्ये डाऊनलोड स्पीड, अपलोड स्पीड, लेटन्सी, ब्राउझिंग आणि व्हिडिओ स्ट्रीमिंग या सर्व घटकांचा विचार केला जातो. या सर्वेक्षणात BSNL ला ८९,१७४ nPoints मिळाले आहेत, तर एअरटेलला ७४,९७५ आणि जिओला ७३,९५७ गुण मिळाले आहेत. यावरून हे स्पष्ट होते की BSNL ने केवळ वेगच नाही, तर एक संतुलित इंटरनेट अनुभव देण्यात यश मिळवले आहे. BSNL च्या डाऊनलोड स्पीडमध्ये वर्षागणिक २१% वाढ होऊन तो ७८.५ Mbps वर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, कंपनीचा अपलोड स्पीड ७५.२६ Mbps इतका आहे, जो जिओ आणि एअरटेलच्या तुलनेत कितीतरी पटीने सरस आहे.

जिओचा डाऊनलोड स्पीड ७९.६ Mbps असला तरी त्यांचा अपलोड स्पीड केवळ ३३.४६ Mbps नोंदवण्यात आला आहे.

**FTTH सेगमेंटमध्ये चुरस**

फायबर-टू-द-होम म्हणजेच ब्रॉडबँड स्पीडच्या बाबतीत एअरटेल २४१.७२ Mbps सह अजूनही आघाडीवर आहे. त्यानंतर जिओ (२२५.१८ Mbps) आणि BSNL (१९८.५४ Mbps) यांचा क्रमांक लागतो. मात्र, एकूण फिक्स्ड-लाइन इंटरनेट गुणवत्तेत BSNL ने सर्वांना धोबीपछाड दिली आहे.

## धबधब्यावर मौजमजा करताना दुर्दैवी घटना

**आंध्र प्रदेश (दै. संध्या) :**

निसर्गाच्या सानिध्यात मौजमजा करण्यासाठी गेलेल्या काही मैत्रिणींवर काळाने घाला घातला. आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्यात तीन अल्पवयीन मुलीचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. अनंतगिरी टेकड्यांमधील मुलागुम्मी गावातील एका धबधब्यावर ही दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्युची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हुकूमपेटा मंडलातील मुलागुम्मी गावाजवळ असलेल्या निसर्गरम्य धबधब्याचा आनंद घेण्यासाठी काही मुली आल्या होत्या.

या मुली धबधब्याजवळ अंघोळीसाठी गेल्या होत्या. त्यावेळी एक मुलगी पाण्यात बुडाली. त्यावेळी एक मुलगी पाण्यात बुडाली आणि तिला वाचवण्याच्या प्रयत्नात इतरही दोन मुलीही वाहून गेल्या. पाण्याचा अंदाज न आल्याने आणि पोहता येत नसल्याने तिघीही पाण्यात बुडू लागल्या.

## नवकार महामंत्रामध्ये विश्व कल्याणाची शक्ती -मुख्यमंत्री

**मुंबई (दै. संध्या)**

दि. ९:सर्व जगामध्ये नवकार महामंत्राचा आजच्या पवित्र दिवशी सामूहिक जप होत आहे. आपली संस्कृती ही विश्वबंधुत्वाची आणि शांती प्रस्थापित करणारी आहे. आपल्या संस्कृतीला नवकार महामंत्र निश्चितच सर्वव्यापी करतो. नवकार महामंत्रामध्ये विश्व कल्याणची शक्ती असून विश्वशांतीसाठी या महामंत्राच्या जपाचा निश्चितच सकारात्मक परिणाम होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन यांच्यावतीने विश्व नवकार महामंत्र दिवस कार्यक्रमाचे आयोजन वरळी येथील एनएससीआय डोम मध्ये करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर आचार्य परम सागर महाराज, निरंजन सागर महाराज, सौम्य सागर महाराज, मानव कोठारी, भगवत कोठारी,आशिष शहा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या जगामध्ये सर्व सजीव प्राणी ही सृष्टीचे मुले आहेत. सर्वांना जीवन जगण्याचा अधिकार आहे. 'जिओ और जीने दो' हे आपले तत्व जैन विचारांमधून प्रतिपादित होते. विश्व कल्याणसाठी यापेक्षा दुसरा विचार असूच शकत नाही. नवकार मंत्र हा अशा विचारांना पुढे नेण्यास मदत करतो. नवकार मंत्राच्या जपातून पाप शुद्धी होऊन सकारात्मक कार्य करण्याची ऊर्जा मिळते. या महामंत्राच्या सामूहिक जपाने संपूर्ण विश्वाच्या शांतीसाठी एक महायज्ञ सुरू आहे. या मंत्रामुळे नवजीवन आपल्याला प्राप्त होते.




नवकार मंत्राच्या माध्यमातून पाच तत्वांना आपण नमस्कार करतो. सर्व जगाला यातून आपण नमस्कार करीत असतो. मंत्राच्या जपाने अरिहंत परिस्थिती निर्माण होते. तीर्थंकरांची अवस्था ही अरिहंताची आहे. या मंत्राच्या जपाने जगामध्ये असलेल्या सर्व सकारात्मक शक्ती आपल्याशी जोडल्या जातात. हा मंत्र केवळ व्यक्तीच्या विचारांनाच शांती देत नाही, तर 'इनर सेल्फ' लासुद्धा शांती देतो. विश्वशांतीचा विचार देणाऱ्या, आनंद देणारा , सकारात्मक शक्तींना जोडणाऱ्या या मंत्राचा जप विश्व कल्याणासाठी फलदायी आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केले.

जैन समाज प्रत्येक जीव, जंतू, प्राणी यांचा विचार करणारा असून भूतदया आणि प्राणी सेवा ही समजात केली जाते. प्राणीसेवेचा विचार केवळ शब्दांमध्ये न ठेवता प्रत्यक्ष वास्तविकतेत जैन समाजामध्ये आणला जातो, असे गौरवोद्गार ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले. कार्यक्रमाला जैन समाजातील आचार्य, मुनी, उपाध्यय, साध्वी व जैन समाज बांधव उपस्थित होते.

# झोपडपट्टी प्राधिकरणाची १६ वी बैठक संपन्न

## लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामास गती द्या – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (दै. संध्या) :**

घाटकोपर येथील लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी ३३२.६२ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या अपात्र झोपडीधारकांना सुद्धा भाडेतत्वावरील घरे योजनेतर्गत घरे देण्यात यावीत. तसेच स्मारकाचे काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई (एसआरए) ची १६ वी बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांचा हस्ते प्राधिकरण कार्यालयातील विविध कक्षांचे ऑनलाइन उद्घाटन झाले. झोपुप्रा, बृहन्मुंबईने संपादित केलेल्या "बृहन्मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे" या पुस्तकाचे आणि प्राधिकरणाच्या दिनदर्शिकेचे अनावरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले. यावेळी नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृहनिर्माण अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, विधि व न्याय प्रधान सचिव दिलीप घुमरे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्यासह प्राधिकरणातील अधिकारी उपस्थित होते. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या संयुक्त भागीदारी प्रकल्पांना मिळणारा अल्प प्रतिसाद, रखडलेले प्रकल्प, अव्यवहार्य योजना यांचा विचार करता शासनामार्फत सन २०२५ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या राज्य गृहनिर्माण धोरण २०२५ अनुषंगाने शासनामार्फत अंमलात आणलेल्या झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेअंतर्गत समूह क्षेत्रांचा एकात्मिक व शाश्वत विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ५० एकर किंवा त्यापेक्षा अधिकच्या भूखंडावरील प्रकल्प हे योजनेमध्ये पुनर्विकसीत करण्याचा निर्णय झाला असून त्याबाबत प्राधिकरणामार्फत समूह क्षेत्र निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे, याचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. या योजनेअंतर्गत अंदाजे ६ ते ७ लाख झोपडी धारकांना पुनर्वसनाचा लाभ होणार आहे.



माता रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथील योजनेसाठी अतिरिक्त ९७ कोटी रुपयांच्या वाढीव निधीस मंजुरी देण्यात आली असून यासाठी आता एकूण ५९७ कोटी निधी आता वापरात येणार आहे. या बैठकीदरम्यान मुख्यमंत्र्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गतच्या योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या प्रकल्पग्रस्त पुनर्वसन सदनिकांचा आढावा घेण्याच्या सूचना दिल्या.

## विमान प्रवास २५ टक्क्यांनी स्वस्त होणार?

**मुंबई (दै. संध्या) :**

इराण-अमेरिका युद्धामुळे इंधन शुल्कात झालेल्या मोठ्या वाढीनंतर विमान प्रवास महागल्याच्या मुद्यावर विमान कंपन्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने आता देशभरातील विमानतळांवरील पार्किंग व लँडिंग शुल्कात २५ टक्क्यांनी कपात करण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर शुल्क माफी प्रवाशांपर्यंत पोहोचविण्यात येणार असून, यामुळे देशांतर्गत विमान तिकिटे २५ टक्क्यांनी कमी होण्याचे संकेत आहेत.

मुंबईसह देशातील प्रमुख ३४ विमानतळांवर ही शुल्क कपात करण्यात येणार असून, आगामी तीन महिन्यांकरिता ती कायम राहणार आहे. केंद्र सरकारने याची अंमलबजावणी करण्याचे आदेश एअरपोर्टस् इकोनॉमिक रेग्युलेटरी ऑथोरिटी ऑफ इंडियाला दिले आहेत.

हेच आदेश भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या अंतर्गत येणाऱ्या विमानतळांनाही लागू राहणार आहेत.

विमान इंधनाच्या किंमतीमध्ये झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर तसेच पश्चिम आशियातील विमान सेवा विस्कळीत झाल्यामुळे विमान कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागत आहे.


## पुणे महानगरपालिका, सांस्कृतिक केंद्रे विभाग

पुणे अद्वितीय & Unique

### निविदा जाहिरात - नवीन निविदा

विक्री कालावधी :- दिनांक १३/०४/२०२६ ते २२/०४/२०२६ दुपारी २:३० वाजेपर्यंत

स्विकृती कालावधी : दिनांक १३/०४/२०२६ ते २२/०४/२०२६ दुपारी २:३० वाजेपर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक:-२३/०४/२०२६ दुपारी ३:०० वा.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण द्वारपाल सेवक संख्या | निविदा संच विक्री | EMD रक्कम रूपये | अंदाजित पूर्वगणक रक्कम रूपये | कामाची मुदत | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC / CULTURAL/ 01/ 2026-27 | सांस्कृतिक केंद्रे विभाग | सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील नाट्यगृहांकरिता द्वारपाल (डोअर किपर) विषयक कामे करणे. | २० | ६,०७९/- | ४ महिने | ५९,१०,२१६/- | १ (एक) वर्ष कालावधी | (राजेश कामठे) प्रशासन अधिकारी सांस्कृतिक केंद्रे मो. नं. ९९७०२३४७१६ |

१) पुणे मनपाची वरील कामे ही अनुभवी/म.न.पा. मान्यताप्राप्त/शासनमान्य ठेकेदारांकडून/खाजगी विकासकांकडून (कामासाठीच्या पूर्व पात्रता अटी निविदा संचात नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.

२) सदर कामाबाबत निविदा अटी शर्ती इत्यादी बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध असून निविदा संच पडताळून निविदा भरावी. निविदा संचाची विक्री व स्वीकृत फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.

३) ऑनलाईन निविदा प्रक्रिया मध्ये शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास त्यांची सर्व जबाबदारी ठेकेदाराची राहील.

४) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२ दि.२२/०४/२०१६ नुसार EMD/बयाना रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधा मार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

५) यशस्वी निविदाधारकास उर्वरित ४% EMD/बयाना रक्कम भरणे बंधनकारक आहे.

सही/-
आशा राऊत
उप-आयुक्त
सांस्कृतिक केंद्रे
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/२५ दि. १०/०४/२०२६

थोडक्यात पण महत्वाचे...




## चाकण येथे शनिवारी सावित्री फाउंडेशनच्या बोधचिन्हाचे अनावरण

चाकण (दैनिक संध्या) : क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांचे विचार व आचार यांच्या धर्तीवर आधारित चाकण येथे शनिवारी (दि.११) सावित्री फाउंडेशनच्या लोगोचे तथा बोधचिन्हाचे अनावरण करण्यात येणार आहे. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील उपबाजाराच्या प्रवेशद्वारावरील महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर शनिवारी सकाळी दहा वाजता या लोगोच्या अनावरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सावित्री फाउंडेशनच्या संस्थापिका अ‍ॅड. मालिनी प्रीतम शिंदे व सहसंस्थापक अ‍ॅड. प्रीतम रामदास शिंदे यांनी दिली. महिला सक्षमीकरण व इतर महत्त्वाच्या सामाजिक विषयांसाठी सावित्री फाउंडेशन कार्य करणार आहे. समाजाला महापुरुषांच्या मिरवणुकांबरोबरच त्यांचे आचार, विचार व आदर्श रुजविण्यासाठी सामाजिक संस्थांची गरज असल्याचे अ‍ॅड. मालिनी शिंदे व अ‍ॅड. प्रीतम शिंदे यांनी सांगितले. जोपर्यंत विश्वाला गती आहे, तोपर्यंत सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याची फुलबाग टवटवीत राहणार आहे. हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून व्यवसायाने वकील असलेल्या चाकण येथील अ‍ॅड. शिंदे दाम्पत्यांनी स्थापन केलेल्या सावित्रीबाई फुले फाउंडेशनच्या लोगोचे अनावरण करण्यात येणार आहे. याप्रसंगी नगराध्यक्षा मनिषा गोरे, गटनेते नितीन गोरे, माजी आमदार अ‍ॅड. राम कांडगे, राजगुरुनगरचे माजी सरपंच शांताराम घूमटकर, नगरसेविका रूपाली कांडगे, पुनम शेवकरी, अ‍ॅड. प्रकाश गोरे, साधना गोरे, स्वाती लेंडघर, मंगेश कांडगे, धीरज मुटके, प्रकाश भुजबळ, रेश्मा मुटके, हर्षद लेंडघर, आकाश जाधव, सागर बनकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



## अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर यमुनानगर जलतरण तलाव नागरिकांसाठी खुला

पिंपरी (दैनिक संध्या) : यमुनानगर परिसरातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी समोर आली असून, अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेला बहुचर्चित यमुनानगर जलतरण तलाव अखेर नागरिकांसाठी खुला करण्यात आला. या तलावाच्या उद्घाटनाचा सोहळा उत्साहात पार पडला. हा जलतरण तलाव सुरू करण्यासाठी शिवसेना नगरसेविका सुलभा उबाळे यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. जलतरण तलावाच्या उद्घाटन समारंभाला नगरसेविका सुलभा उबाळे तसेच नगरसेवक नगरसेवक बापू घोलप, उत्तम केंदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद व्यक्त केला. नवीन सुरू झालेल्या या जलतरण तलावात नागरिकांना पोहण्यासोबतच व्यायामाची सुविधा उपलब्ध होणार असून कुटुंबीयांसोबत विरंगुळा घालवण्यासाठीही हे ठिकाण आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. प्रशासनाकडून तलावाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित आणि आनंददायी अनुभव मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. दरम्यान, शहरातील नागरिकांसाठी हा जलतरण तलाव विशेषतः उन्हाळा आणि पावसाळ्यात थंडावा देणारे आदर्श मनोरंजन स्थळ ठरेल, अशी माहिती नगरसेविका सुलभा उबाळे यांनी दिली.



## पवना आणि इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाबाबत मंत्री पंकजा मुंडे पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर

पिंपरी (दैनिक संध्या) : पवना आणि इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाच्या विषयामध्ये पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे अधिक लक्ष घालणार आहेत. त्यासाठी त्या उद्या, शुक्रवारी (दि.१०) पिंपरी-चिंचवडच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यामध्ये पंकजाताई दुपारी एक वाजता त्या तळवडे येथील 'रॉ वॉटर पंपिंग स्टेशन' आणि इंद्रायणी नदीच्या सद्यःस्थितीची पाहणी करणार आहेत. त्यानंतर दुपारी १:३० वाजता रावेत येथील पंपिंग स्टेशनला भेट देऊन पवना नदीच्या प्रदूषणाचा आढावा घेणार आहेत. त्यानंतर दुपारी २ च्या सुमारास पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आकुर्डी येथील कार्यालयात त्या नदी प्रदूषणावरील उपाययोजनांबाबत महत्त्वाची बैठक घेतील. शनिवारी (दि. ११) पंकजा मुंडे या पुण्यातील मुळा-मुठा नदी प्रदूषणाची पाहणी करतील. पवना व इंद्रायणी नदीचे वाढते प्रदूषण पाहता पंकजा मुंडे यांचा हा दौरा महत्त्वाचा आहे. नदी प्रदूषणावर ठोस उपाययोजना केल्या जातील, अशी शहरवासियांना अपेक्षा आहे.

## गॅस दरवाढीचा फटका; नवलाख उंबरेत हॉटेलचे दर वाढले

नवलाख उंबरे (दैनिक संध्या) : अलीकडील गॅसदरवाढ आणि व्यावसायिक गॅस सिलिंडर वेळेवर उपलब्ध न होण्याच्या समस्येमुळे हॉटेल व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. या परिस्थितीत अनेक हॉटेलचालकांनी खाद्यपदार्थांच्या दरात वाढ केली आहे. परिणामी, सामान्य नागरिकांच्या खिशावर ताण पडत असून, त्यांच्या जीवनशैलीत बदल होताना दिसत आहे. यामुळे नागरिकांनी हॉटेलच्या जेवणाकडे पाठ फिरवली असून घरगुती जेवणाकडे कल वाढला आहे.

# बोगस उपसूचनांच्या प्रकरणाला वेगळं वळण

## 'त्या' प्रस्तावावर 'स्थायी'तील भाजपच्या दोन नगरसेवकांच्या सह्या..!



- महापालिकेत नियमबाह्य बिले दिल्याप्रकरणी चौकशी
- भाजपच्या नगरसेविका अर्चना करांडे सूचक म्हणून आणि योगिता नागरगोजे यांची अनुमोदक

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महापालिकेत नियमबाह्य बिले दिल्याप्रकरणी चौकशी समिती स्थापन झाली असून, सत्तारूढ भाजपने आणि विरोधी पक्षाने प्रशासनावर तोंडसुख घेण्यास सुरुवात केली आहे. मात्र, या प्रकाराचे मूळ असणाऱ्या वाढ आणि घट करण्याच्या प्रस्तावावर स्थायी समितीतील भाजपच्या दोन नगरसेवकांच्या सह्या असल्याची माहिती समोर आली आहे.

महापालिकेत बोगस उपसूचनांच्या आधारे सुमारे ५२ कोटी रुपयांची देयके नियमबाह्य पद्धतीने अदा केल्याचे उघडकीस आले आहे. यातील मुख्य सूत्रधार मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीणकुमार जैन यांची सखोल चौकशी करून त्यांना तत्काळ सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणी होऊ लागली.

### प्रस्तावामागील मुख्य सूत्रधार कोण?

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, यासंदर्भातील वाढ आणि घट करण्याच्या प्रस्तावावर स्थायी समितीतील भाजपच्या नगरसेविका अर्चना करांडे यांची सूचक म्हणून आणि योगिता नागरगोजे यांची अनुमोदक म्हणून स्वाक्षरी आहे. मात्र, हा प्रस्ताव स्थायी समिती सभापतींकडे न देताच थेट लेखा विभागाकडे दिल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. या प्रस्तावामागील मुख्य सूत्रधार कोण, याबाबतची चर्चा रंगली आहे.

## नवीन रिक्षाच्या आमिषाने चालकाची फसवणूक

- बनावट पावती देत एका चालकाची एक लाख रुपयांची फसवणूक

पिंपरी (दै. संध्या)

नवीन रिक्षा देण्याचे आमिष दाखवून बनावट पावती देत एका चालकाची एक लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. ही घटना वाकड येथील रिदम ऑटो, विनोदेवस्ती येथे १० फेब्रुवारी २०२५ ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान घडली.

विकास अभिमन्यू वाघमारे (४३, रा. थेरगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, किशोर ऊर्फ सचिन सुधाकर बागडे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीला नवीन अल्टो रिक्षा देण्याचे सांगून बुकिंगसाठी ५ हजार आणि रोख १ लाख रुपये घेतले. त्यानंतर कोणतीही कागदपत्रे, विमा किंवा पासिंग नसलेली रिक्षा देऊन फसवणूक केली.

फिर्यादीने आक्षेप घेतल्यानंतर रिक्षा परत घेतली. मात्र, पैसे परत न देता विश्वासघात केला.

## महानगरपालिकेत ५२ कोटींचा 'बोगस उपसूचना' घोटाळा

पिंपरी (दै. संध्या)

बोगस उपसूचनांच्या आधारे सुमारे ५२ कोटी रुपयांची देयके नियमबाह्य पद्धतीने अदा करण्यात आल्याचा खळबळ जनक प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार म्हणजे महानगरपालिकेच्या तिजोरीची केलेली लुट असून, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविणकुमार जैन यांची सखोल चौकशी करुन त्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी आक्रमक मागणी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी मा. आयुक्त सो डॉ. विजय सुर्यवंशी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. महानगरपालिकेच्या स्थापत्य, पाणीपुरवठा आणि बीआरटी विभागाशी संबंधित सुमारे ७० कामांची बिले कोणत्याही अधिकृत मान्यते शिवाय ठेकेदारांना देण्यात आली.

## 'महापौर युवा संकल्प रोजगार केंद्रा'चा शुभारंभ; युवकांनो फसवणूक टाळा!

भोसरी (दै. संध्या)

- महापौर रवि लांडगे यांचा 'मोफत नोकरी'चा मास्टरप्लॅन;गरजू मुला-मुलींसाठी 'शून्य रुपये' खर्चात करिअरची संधी

राज्यातील आणि परराज्यातील हजारो तरुण-तरुणी रोजगाराच्या शोधात पिंपरी-चिंचवड आणि चाकण या औद्योगिक नगरीत येत असतात. मात्र, योग्य मार्गदर्शनाअभावी अनेकदा त्यांची आर्थिक फसवणूक होते, तर कधी नोकरीसाठी मोठी रक्कम मागितली जाते. तरुणांची ही वणवण थांबवण्यासाठी आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि बाबासाहेब लांडगे यांच्या संकल्पनेतून 'महापौर युवा संकल्प रोजगार, कौशल्य विकास व करिअर मार्गदर्शन केंद्र' भोसरी आणि चाकण येथे सुरू करण्यात आले आहे. भोसरी येथील संविधान चौका जवळ असलेल्या फुगे प्रायमा येथे 'महापौर युवा संकल्प रोजगार, कौशल्य विकास व करिअर मार्गदर्शन केंद्र' या कार्यालयाचे उद्घाटन (दि.९) महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी डॉ संजय झोपे, संदीप पलांडे, प्रकाश लांडगे, कैलास लांडगे,प्रथमेश शेलार, आकाश कंद, प्रतीक शिंदे, अ‍ॅड प्रतीक बोराडे, संदीपक राठी, निखिल मसने, प्रशांत पवार, रुपेश खोपडे, जयश्री वाघमोडे, कांचन जगताप, कृष्णा अगरवाल, अब्दुल अहमद आदी उपस्थित होते.

या केंद्राच्या वैशिष्ट्यांबद्दल माहिती देताना महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की,ज्या मुलांकडे कौशल्य आहे पण आर्थिक परिस्थितीमुळे ते मागे पडतात, अशा शेवटच्या घटकातील मुला-मुलींना या केंद्रातून १००% मोफत सेवा मिळणार आहे.बाहेरून येणाऱ्या अनेक होतकरू मुलांना राहण्याची जागा शोधण्यापासून ते जॉब मिळवण्यापर्यंत प्रचंड मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागतो. अनेकदा एजंटकडून त्यांची फसवणूक केली जाते. हा अन्याय थांबवण्यासाठी आम्ही ही केंद्रे पूर्णपणे 'विनामूल्य' सुरू केली आहेत.

## चाकण एमआयडीसीत हरताळ

चाकण (दै. संध्या)

राज्य शासनाने पंन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशवीवर बंदी घातली आहे. परंतु चाकण शहरासह चाकण एमआयडीसीत प्लॅस्टिक बंदीला हरताळ फासला आहे. कॅरीबॅगचा मोठ्या प्रमाणात अतिरेक होऊ लागला असून, सर्वचजण हातघाईला आले आहेत.

प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरांवर राज्य सरकारने बंदी जाहीर केल्यानंतर चाकण नगरपरिषदेनेही कडक अंमलबजावणी करत शहरात प्लॅस्टिक बंदी केली होती. सुरुवातीच्या काळात नगरपरिषदेने कडक अंमलबजावणी करून अनेक छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली होती. त्यासोबत शहरातील महात्मा जोतीराव फुले भाजीपाला उपबाजारात जनजागृती करून प्लॅस्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन केल्याने सर्वच स्तरावरील व्यवसायिकांनी प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर बऱ्यापैकी बंद केला होता. परंतु हा कारवाईचा बागुलबुवा काही दिवसांत फुटला.

## काँग्रेस पक्ष पुनर्बांधणीसाठी 'संघटन सृजन अभियान' सुरू – काँग्रेस निरीक्षक आमदार विनोद सुलतानपुरी

पिंपरी (दै. संध्या)

काँग्रेस पक्ष संघटनेच्या पुनर्बांधणी साठी बूथ स्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत 'संघटन सृजन अभियान' राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी चिंचवड शहरातील सर्व पदांसाठी इच्छुक असणाऱ्या कार्यकर्त्यांना भेटून वैयक्तिकरित्या संवाद साधला आहे. या अभियानाचा अहवाल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला सादर करण्यात येणार आहे अशी माहिती राष्ट्रीय काँग्रेसचे पिंपरी चिंचवड शहर निरीक्षक आमदार विनोद सुलतानपुरी यांनी दिली.

आज पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सुलतानपूरी बोलत होते. यावेळी काँग्रेस प्रदेश सचिव दाहर मुजावर, आमदार जयंत आजगावकर, निरीक्षक आनंद सिंग, एआयसीसी सचिव पृथ्वीराज साठे, निरीक्षक भानुदास माळी, सचिव मनोज कांबळे, बाबू नायर, कौस्तुभ नवले, सायली नढे आदी उपस्थित होते. या पत्रकार परिषदेचे स्वागत प्रास्ताविक मयूर जयस्वाल यांनी केले.




यावेळी विनोद सुलतानपुरी यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड जिल्हास्तरावर काँग्रेस संघटन पातळीवर कमकुवत आहे याची आम्हाला जाणीव आहे. आजच्या बैठकीत सर्वांनी आपली मते निसंकोचपणे व्यक्त केली. या अगोदर मोठ्या निर्णयासाठी येथील कार्यकर्त्यांना मुंबईत जायला लागत होते, परंतु आता स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांशी चर्चा करून येथेच निर्णय होतील. शहराध्यक्ष पदासाठी सुमारे ३५ लोकांनी इच्छा व्यक्त केली आहे. ब्लॉक अध्यक्ष तसेच इतर पदांसाठी देखील इच्छुकांनी मुलाखती दिल्या आहेत.

पृथ्वीराज साठे यांनी सांगितले की, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली हे वर्ष 'संघटन बांधणीचे वर्ष' म्हणून साजरे केले जात आहे. महाराष्ट्रातहि 'संघटन सृजन अभियान' जोमाने सुरू झाले आहे. हे अभियान म्हणजे काँग्रेसला तळागाळातून मजबूत करण्याचा संकल्प आहे.

निरीक्षक भानुदास माळी यांनी सांगितले की, अभियानाचा पाहिला टप्पा म्हणजे जिल्हा व ब्लॉक स्तरावर अध्यक्षांची नव्याने नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, सेवादल, एनएसयुआय, अनुसूचित जाती विभाग, अनुसूचित जमाती विभाग, इतर मागासवर्गीय विभाग, अल्पसंख्यांक विभाग, भटक्या विमुक्त जमाती विभाग, सोशल मीडिया विभाग पदांसाठी निरीक्षक शिफारस करतील. या सर्व पदाधिकारी निवडीमध्ये सामाजिक समतोल राखला जाईल. प्रत्येक ब्लॉक विषयी निरीक्षक कार्यकर्त्यांशी चर्चा करत आहेत त्यांचे म्हणणे समजून घेऊन तेथील राजकीय परिस्थितीचा अभ्यास करून निरीक्षक आपल्या शिफारशी व अहवाल प्रदेश आणि राष्ट्रीय काँग्रेसला सादर करणार आहे. संघटनेची खरी ताकद आता बूथ आणि वॉर्ड अध्यक्षांच्या हातात असेल. सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हे काँग्रेसचे मुख्य ध्येय व उद्दिष्ट आहे. यामुळे पुढच्या काळात शिस्तबद्ध संघटन हीच काँग्रेसची खरी ओळख ठरेल असे भानुदास माळी यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते विष्णुपंत नेवाळे, अमर नाणेकर, डॉ. मनिषा गरुड, गिरिजा कुदळे, शीतल कोतवाल, नरेंद्र बनसोडे, विठ्ठल शिंदे, गौरव चौधरी, मकरध्वज यादव आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## महापालिका कर्मचाऱ्याच्या मुलाची उत्तुंग भरारी

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी भांडारपाल भास्कर रिकामे यांचे चिरंजीव डॉ. केतन भास्कर रिकामे यांना ख्राईस्ट युनिव्हर्सिटी, बंगलोरकडून एस्ट्रोफिजिक्स विषयात पी.एच. डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर तसेच जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,अभिषेक फुगे, अतुल आचार्य,हनुमंत लांडगे आदी उपस्थित होते.

निगडी येथील रहिवासी असलेले डॉ. केतन रिकामे सध्या रमन रिसर्च इन्स्टिट्यूट, बंगलोर येथे ब्लॅक होल आणि अवकाशातील घटकांमधून उत्सर्जित होणाऱ्या क्ष-किरणांच्या अभ्यासासाठी उपकरण विकसित करण्यावर संशोधन करत आहेत. त्यांनी विकसित केलेले 'एक्स-रे पोलारिमीटर' हे उपकरण जानेवारी २०२४ मध्ये इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गेनायझेशनच्या XPoSat उपग्रहामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतरिक्ष केंद्रातून प्रक्षेपित झालेल्या या उपग्रहाद्वारे अवकाशातील ब्लॅक होलचा सखोल अभ्यास करण्याचे कार्य सुरू आहे.

या प्रकल्पामध्ये डॉ. केतन यांनी इस्रोच्या शास्त्रज्ञांसोबत काम करत उपकरणाची निर्मिती, चाचणी आणि उपग्रहात बसविण्यापर्यंतचा महत्त्वाचा सहभाग नोंदविला आहे.



या उपकरणाच्या माध्यमातून अवकाशातून येणाऱ्या क्ष-किरणांचे संकलन करून त्यावर संशोधन केले जात आहे. डॉ. केतन यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स त्यामध्ये एज्युकेशन आणि रिसर्च, पुणे येथून बी.एस. व एम.एस. पदवी प्राप्त केली असून, त्यानंतर इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रोनॉमी ॲन्ड ॲस्ट्रोफिजिक्स तसेच कॅलिफॉर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे विविध संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे. याशिवाय, गेल्या पाच वर्षांपासून ते रमन रिसर्च इन्स्टिट्यूट येथे डॉ. बिश्वजित पॉल व डॉ. व्ही. जितेश यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करत असून भारतीय अंतराळ संशोधन संस्थेशीही त्यांचे संशोधन कार्य संलग्न आहे.

डॉ. केतन यांच्या यशामागे त्यांचे वडील भास्कर रिकामे यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत भांडारपाल म्हणून कार्यरत असताना त्यांनी प्रामाणिकपणे सेवा बजावत आपल्या कुटुंबाला शिक्षणाची भक्कम पायाभरणी करून दिली. त्यांच्या कष्ट व संस्कारांमुळेच डॉ. केतन यांनी आज जागतिक पातळीवर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये आराध्या तुळशीदास मेटकरी चा मानाचा तुरा

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : आंध्रप्रदेश मधील गुंटूर मध्ये नुकताच पार पडलेल्या एनटीपीसी आयोजित राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये हडपसर येथील आराध्या तुळशीदास मेटकरी ने उत्तम कामगिरी करत दहा वर्षे वयोगटाखालील स्पर्धेमध्ये पंधरावा नंबर मिळवला. आराध्या ही कंपाउंड आर्चरी खेळत असून तिने हे यश अवघ्या तीन महिन्यांमध्ये संपादन केले आहे, मार्च महिन्यात झालेल्या, महापौर चषक २०२६ मध्ये सिल्वर मेडल मिळवले, तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये तिने चौथा क्रमांक पटकावला व सोलापूर मधील आयोजित महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या असोसिएशन स्पर्धेत तिने नववा क्रमांक पटकावला तसेच सांघिक खेळा मध्ये गोल्ड मेडल मिळवून तिने राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये स्थान मिळवले. आंध्र प्रदेश येतील एनटीपीसी आयोजित राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत तिने पंधरावा नंबर मिळवला. हे मिळालेले यश हे माझे प्रशिक्षक विजय अंबुरे व माझे वडील तुळशीदास मेटकरी व माझी मम्मी सुप्रिया मेटकरी यांच्यामुळेच मिळाले असल्याचे आराध्या हिने सांगितले.



### बेल्हे गावच्या उपसरपंचपदी नवनाथ शिरतर बिनविरोध

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजेंद्र पिंगट यांची पंचायत समिती सदस्यपदी निवड झाल्यामुळे त्यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे ग्रामपंचायतीची उपसरपंच पदाची जागा रिक्त होती. त्या रिक्त झालेल्या जागेसाठी विद्यमान सरपंच मनीषा डावखर यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये नवनाथ शिरतर यांची उपसरपंच पदासाठी बिनविरोध निवड करण्यात आली. या उपसरपंच पदासाठी एकूण 8 जणांनी अर्ज दाखल केले होते. मात्र सर्वांनी एकत्र येऊन गावच्या विकासाच्या दृष्टीने निर्णय घेऊन सात जणांनी अर्ज माघारी घेतले व एक अर्ज हा नवनाथ शिरतर यांचा शिल्लक राहिल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अशी माहिती प्रशासकीय अधिकारी किशोर रायसिंगवाकडे यांनी दिली. यावेळी पंचायत समिती सदस्य राजेंद्र पिंगट,माजी सरपंच विश्वनाथ डावखर,गोरक्षनाथ वाघ, जानकु डावखर,वसीम बेपारी, कैलास औटी, पाराजी बोरचटे, अशोक शिरतर, स्वप्निल भंडारी, सावकार पिंगट, सुनील आरोटे, राजेंद्र गफले, किरण मंडाले, जाफर पठाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



### जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील मोटारसायकल चोरणारा सराईत चोर अटकेत

नारायणगाव (दैनिक संध्या) : पुणे ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीमध्ये मंचर, घोडेगाव, नारायणगाव, ओतूर या परिसरातून मोटरसायकल चोरी जाण्याचे प्रमाण वाढले होते. सदर मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्याच्या सूचना पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सहायक फौजदार साबळे, पोलीस हवालदार वारे, नवले सदर गुन्ह्यांचा समांतर तपास करत असताना घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून पुढील तपास सुरू केला. सदर सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता प्रत्येक ठिकाणी तोच चोरटा असल्याचे दिसून आले. मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार अक्षय नवले यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की सदर सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसणारा इसम हा रेकॉर्डवरील मोटरसायकल चोर राहुल अशोक दाते राहणार मंचर हा आहे. तसेच त्याच्यावर यापूर्वी देखील बरेच गुन्हे दाखल आहेत. तरी तो आज त्याच्या ताब्यातील चोरीच्या मोटरसायकल ह्या घोडेगाव नारोडी फाटा येथे विक्रीसाठी आणणार असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत समजले त्यावरून गुन्हे शाखेच्या पथकाने तसेच घोडेगाव पोलिस स्टेशन कडील पथकाने सदर ठिकाणी सापळा लावून त्यास ताब्यात घेऊन त्याच त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव राहुल अशोक दाते (वय २५ राहणार मंचर, ता. आंबेगाव जि. पुणे) असे सांगितले. त्याच्या ताब्यातून घोडेगाव, मंचर, नारायणगाव,ओतूर या ठिकाणाहून चोरीस गेलेल्या चार मोटारसायकल तसेच नारायणगाव येथून चोरीस गेलेला एक मोबाईल असा १,११,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# केडगाव मध्ये महसुल विभागाची मोठी कारवाई

- १० लाख ६९ हजार ८५६ रुपयांचा गहू व तांदळाचा साठा जप्त
- गहू किंमत ८ लाख ८५ हजार ६०० रुपये व ४५ ते ५० किलोग्राम

दौंड (दै. संध्या)




दौंड तालुक्यातील केडगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गाळ्यात काळ्या बाजारामध्ये विक्रीस ठेवलेले रेशनचे धान्य जप्त करीत जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत यवत पोलिसांनी व दौंड महसूल विभागाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. सुमारे १० लाख ६९ हजार ८५६ रुपयांचा गहू व तांदळाचा साठा जप्त करण्यात आला आहे अशी माहिती यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी दैनिक संध्याला दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केडगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आडतदार सुनिल विश्वनाथ निंबाळकर यांनी भाडोत्री घेतलेल्या गाळ्यात पांढऱ्या रंगाचे नायलॉनचे ४५ ते ५० किलोग्राम वजनाचे एकूण ४९२ कट्टे यामध्ये गहू किंमत ८ लाख ८५ हजार ६०० रुपये व ४५ ते ५० किलोग्राम वजनाचे एकूण

१४४ पांढरे रंगाचे नायलॉनचे कट्टे तांदूळ किंमत २ लाख ८४ हजार २५६ रुपये असा एकूण १० लाख ६९ हजार ८५६ रुपये किंमतीचा सरकारमान्य रास्तभाव दुकानातील माल प्रथमदर्शनी आपले ओळखीचे गिऱ्हाईकाना काळ्याबाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने जिन्नस वस्तू साठवणूक करण्याचे परवाना मुदत २०१८ साली संपलेली असताना देखील सदर गाळ्यात हा धान्याचा साठा आढळून आला आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ प्रमाणे पंकज गोपाळ गोरे, पुरवठा निरीक्षक, दौंड तहसील यांच्या फिर्यादीनुसार सुनिल निंबाळकर (रा.केडगाव,ता.दौंड) यांच्यावर दि. ८ एप्रिल रोजी यवत पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किशोर वागज हे करीत आहेत.

या कारवाईमुळे केडगाव परिसरात खळबळ उडाली असून, अवैध साठेबाजीवर पोलिसांनी व महसूल विभागाने केलेल्या कारवाईमुळे नागरिकांमधून त्यांचे कौतुक होत आहे.

## सहा शाळांना सोलर प्लांटचे लोकार्पण

जुन्नर (दै. संध्या)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरे खुर्द येथे मंगळवार दिनांक 7 एप्रिल 2026 रोजी दुपारी 2 वाजता क्लीन एनर्जी एक्सेस प्रोग्रॅम अंतर्गत ऍपटीव्ह कंपोनेंटस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड व आय. आय. ई. सी. यांच्या वतीने " सोलर प्लांट लोकार्पण सोहळा " चे उदघाटन एपष्टिव्ह कंपनी चे अधिकारी संकेत जाधव, सागर वाव्हळ व आय. आय. ई. सी. चे सिनियर अधिकारी अमर यादव, सिनियर प्रोग्राम मॅनेजर अनंत जोशी, अधिकारी जायनवाट मनीष सेहरावत, समन्वयक तुषार बिनवडे, अंकुश कोकणे मान्यवर पदाधिकारी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आय.आय. ई. सी. चे प्रमुख अधिकारी अमर नाथ यादव होते. जुन्नर तालुक्यातील हिवरे खुर्द, पाडळी, चिंचोली मराठी, घाटघर, सितेवाडी, करंजाळे या शाळांना सोलर प्लांट देण्यात आले.

विजेची सोय व्हावी म्हणून हा प्रकल्प भविष्यात इतर शाळांना उपयुक्त ठरेल. त्यामुळे शाळेत संगणक कक्ष, विजेच्या संबंधित सोयी सुविधा असतील तर निश्चित त्यासाठी सोलर चा फायदा होईल. असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कंपनीच्या सर्व अधिकारी यांचा सन्मान चिन्ह, शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितीत ग्रामस्थ व मान्यवरांचा सर्व शाळांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच राज्य गुणवत्ता यादीत आलेले वेदांत विशाल येंधे व ओम संतोष शिर्के व मार्गदर्शक शिक्षक निलेश सरोदे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी पंचायत समिती जुन्नर चे गटविकास अधिकारी प्रतिक चन्नावार, सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर, गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू धोंडगे, केंद्रप्रमुख रविंद्र कुटे, जिल्हाध्यक्ष सुभाष मोहरे, चिंचोली शाळेचे युवराज मोहरे, पाडळी सितेवाडी शाळेचे होना गवारी, पंढरीनाथ लांडे, करंजाळे शाळेचे साहेबराव मांडवे, लक्ष्मण यंदे, घाटघर शाळेचे बाळासाहेब शिंदे, प्रशांत लोखंडे उपस्थित होते.तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर वायकर, उपाध्यक्ष दिपाली जाधव, सरपंच मनीष बर्डे, उपसरपंच लक्ष्मण वायकर, चिंचोलीचे सरपंच काशिद, दत्तूशेठ वायकर, अशोक वायकर, प्रकाश वायकर, रामदास येंधे, कृष्णा लोखंडे, केरभाऊ शिर्के, रोहिदास जाधव, मयूर वायकर, ग्रामसेवक विलास वायकर , निलेश औटी, अर्चना औटी, शितल वाकचौरे, वर्षा बर्डे, हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद्र भोर, यशराज वायकर, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन विकास मटाले, गुणवंतराव इंगळे, सुरेखा म्हस्के, वर्षा बर्डे यांनी केले. प्रास्ताविक हिवरे खुर्द शाळेचे मुख्याध्यापक अन्वर सय्यद यांनी केले.

## प्रशांत वाघमारे प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी

कवठे येमाई (दै. संध्या)

पुणे महानगरपालिकेचे माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्याविरोधातील बेहिशेबी मालमत्ता प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात महानगरपालिकेने सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी, अशी मागणी हायलाईट फोरमचे अध्यक्ष उमेश नाईक यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांना दिलेल्या पत्रात नाईक यांनी नमूद केले आहे की, वाघमारे यांच्यावरील आरोप गंभीर स्वरूपाचे असून त्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही महानगरपालिकेने कायदेशीर पावले उचलून सर्वोच्च न्यायालयात अपील करावे, जेणेकरून प्रकरणाचा योग्य निकाल लागू शकेल.तसेच, वाघमारे यांच्यावरील आरोप निराधार असल्याचे सिद्ध करण्यासाठीही पारदर्शक चौकशी आवश्यक असल्याचे पत्रात म्हटले आहे. या संदर्भात महानगरपालिकेने तातडीने कारवाई करून न्यायालयीन प्रक्रियेत पुढाकार घ्यावा, अशी मागणी उमेश नाईक यांच्याकडून करण्यात आली आहे.

## एसआयआर मॅपिंगमध्ये नाव मॅप झाल्याची खात्री करा : नगरसेविका जगनाडे

चाकण (दै. संध्या)

शहरात सध्या सुरु असलेल्या एसआयआर मॅपिंग मध्ये आपण आपले नाव मॅप झाले आहे का, याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका तृप्तीताई किशोरशेठ जगनाडे यांनी केले आहे.

ज्या मतदारांचे नाव सन २००२ च्या मतदार यादी मध्ये आहे, त्यांनी त्यांचे डिटेल्स, तर ज्यांचे नाव



२००२ च्या यादीमध्ये नाही, अशा नागरिकांनी आपले आई, वडील, आजी, आजोबा यापैकी एकाचे २००२ चे डिटेल्स देऊन मॅपिंग करून घेणे बंधनकारक आहे.

तसेच ज्या महिलांचे नाव २००२ च्या यादीमध्ये नाही, त्यांनी आपल्या माहेरचा पुरावा म्हणजेच आई, वडील, आजी, आजोबा यापैकी एकाचे २००२ चे डिटेल्स देऊन मॅपिंग करून घेण्याची गरज आहे. तृप्तीताई जगनाडे यांनी सांगितले की," सन २००२ ची मतदार यादी ही इसीआयएनईटी ह्या ॲप प्ले स्टोअर वरुन डाऊनलोड करावी."

प्ले स्टोअरवर या ॲपमध्ये सन २००२ ची नावे सर्च केल्यावर मिळतात. जो यादी भाग क्रमांक असेल त्याप्रमाणे आपण दिलेल्या बीआयओ व पर्यवेक्षक असेल त्यांच्या मोबाईल नंबरवर संपर्क साधून त्यांना ते पुरावे दाखवून त्याची माहिती करून घेणे अपेक्षित आहे.

प्रत्येकाने आपले नाव मॅपिंग झाल्याची खात्री पर्यवेक्षकांकडे संपर्क साधून त्यातील स्पष्टता जाणून घेतली पाहिजे असे नगरसेविका तृप्तीताई किशोरशेठ जगनाडे व उद्योजक किशोरशेठ दशरथ जगनाडे यांनी सांगितले.

## भोसलेवाडी येथे सलग 28 व्या वर्षी कीर्तन महोत्सवाचे आयोजन

जेजुरी (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील भोसले वाडी येथे अखिल छत्रपती शिवजयंती उत्सव मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने सलग 28 व्या वर्षी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन महोत्सव व ज्ञानयोग सोहळ्याचे आयोजन दिनांक 13 ते 20 एप्रिल दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती हभप पोपट महाराज भोसले व ह.भ.प. जालिंदर महाराज भोसले यांनी दिली.

या सोहळ्यात ह.भ.प. प्रवीण महाराज शेंडकर, प्रवीण महाराज चौधरी, आचार्य अमृतश्रम स्वामी, कबीर महाराज आतार, महादेव महाराज राऊत, एकनाथ महाराज चतरशास्त्री, महंत प्रमोद महाराज जगताप यांचे कीर्तन व ह.भ.प. लक्ष्मण महाराज कोकाटे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या सोहळ्यात राज्याचे विश्व वारकरी संघाचे अध्यक्ष पांडुरंग महाराज साळुंखे, वारकरी सेवा संघाचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ चोपदार, संत सोपान महाराज मंदिराचे विश्वस्त ह.भ.प. त्रिगुण महाराज गोसावी मार्गदर्शन करणार आहेत. दररोज काकडा, हरिनाम, भजन, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

## मातृशक्तीला जागृत करण्याचे काम संघ करत आहे

जेजुरी (दै. संध्या)

इस्लामी जिहाद मुळे हिंदू तरुणी, महिला यांच्यावर अत्याचार होत आहेत. ही अत्यंत चिंतेची बाब आहे. मातृशक्ती कडे सामर्थ्य आहे, या मातृ शक्तीला जागृत करण्याचे काम संघ करीत आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र रणरागिणी महिला विचार मंचाच्या संस्थापक अध्यक्षा उज्वला गौड यांनी व्यक्त केले.

जेजुरी येथे मल्हार गौतमेश्वर मंदिर आवारात विराट हिंदू संमेलन समितीच्या वतीने विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. उज्वला गौड पुढे म्हणाल्या की काही दिवसांपूर्वी ओवेशी ने इस्लाम यात्रा काढली हिरवे झेंडे लावून हा ताफा सुसाट सुटला, शासनाने हा ताफा अडवला नाही. मात्र आज बापदेव घाटा मध्ये आमदार गोपीचंद पडळकर, आणि संग्राम भैया जगताप यांनी काढलेला मोर्चा पोलिसांनी अडवला. बापदेव घाटात हनुमान चालीसा म्हणू दिली नाही. हे देशासाठी घातक आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून रोज बैठका, कार्यक्रम घेवून हिंदू मध्ये जनजागृती केली जात आहे, हिंदू राष्ट्र घडविण्यासाठी अनेक वर्षे कार्य केले जात आहे, संघाचे हे दैवी कार्य आहे.

मातृ शक्ती ही तेजस्वी आहे याचा विसर पडत चालला आहे. राजमाता जिजाऊ ने प्रेरणा दिल्यामुळे छत्रपती शिवरायांनी ही हिंदवी स्वराज्य निर्माण केले.

आपल्या मुलींकडे लक्ष देण्यासाठी माता माऊली कडे वेळ नाही, दिवसा मोबाईल रात्री टिव्हीचा रिमोट त्यांच्या हातात आहे. आता मातृ शक्तीने चिंतन करण्याची गरज आहे. देशात 50 हून अधिक मुस्लिम राष्ट्रे निर्माण झाली आहेत. भारताचे इस्लामी करण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्वधर्म समभाव, भाई चारा यासारखा रोग पसरवला जात आहे असे सांगितले.

लेखक व इतिहासाचे अभ्यासक भरत आमदापूरे यांनी पाचव्या शतकापासून अनेक हिंदू राजांनी तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून इस्लामीकरण रोखण्याचे कार्य केले. अनेक औलादी छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या सैन्यात मुस्लिम सैन्य होते असे सांगून सांस्कृतिक विकृतीकरण करत आहेत.शिवाजी महाराजांनी हिंदू संस्कृतीचे संरक्षण व जतन केले आहे असे सांगितले.

तर हभप मनोज मोरे यांनी हिंदू धर्म, संस्कृती बाबत माहिती दिली. यावेळी श्री मार्तंड देवसंस्थान चे विश्वस्त अड पांडुरंग थोरवे, डॉ राजेंद्र खेडेकर, पोपट खोमणे, विश्वास पानसे व मोठ्या संख्येनं नागरिक उपस्थित होते.

विराट हिंदू संमेलन समितीचे राजाभाऊ चौधरी, शैलेश राऊत, किरण बारभाई, अमित गुरव, सागर गोडसे, वैभव लांघी आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# शेतपंपांच्या केबल चोरीच्या घटना वाढल्या

## प्रशासनाकडे कडक कारवाईची मागणी; नदी पात्रातील शेतपंपांना जोडलेल्या कॉपर केबलची चोरी

उरुळी कांचन (दै. संध्या)

- आठ ते दहा शेतकरी बाधित झाले
- एक लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती


परिसरात शेतकऱ्यांच्या अडचणीत भर टाकणाऱ्या केबल चोरीच्या घटना पुन्हा समोर आल्या आहेत. नदी पात्रातील शेतपंपांना जोडलेल्या कॉपर केबलची चोरी होण्याचे प्रकार गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने घडत असून, यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

गुरुवार (दि. ८ एप्रिल) रोजी सकाळी सुमारे ११ वाजता वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतकरी शेतपंप सुरू करण्यासाठी गेले असता पंप चालू न झाल्याने त्यांनी पाहणी केली. यावेळी शेतपंपांच्या कॉपर केबल चोरीला गेल्याचे उघड झाले. या घटनेत अंदाजे एक लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

या चोरीच्या प्रकारात रामभाऊ यादव, बबन कोलते, गणेश शितोळे, गणेश कड, अर्जुन कड, योगेश पवार, सचिन सरडे, ताटे आदी शेतकऱ्यांच्या शेतपंपांच्या केबल चोरीला गेल्या आहेत.

कोरेगाव मूळ ग्रामपंचायत हद्दीतील दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून ही चोरी झाली असून, एकूण आठ ते दहा शेतकरी बाधित झाले असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.





## थोडक्यात पण महत्वाचे...



### दक्षता पथक तपासणीचे काय झाले ? किती बोगस कामगार दलाल पकडले?

मुंबई (दैनिक संध्या) : अर्थ संकल्पीय अधिवेशनात अनेक लोकप्रतिनिधी नी याबाबत प्रश्न विचारले होते. उत्तर मात्र गोलमाल होते.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांच्या घरी जाऊन दलालांनी अर्ज भरून घेतले जातात. त्यासाठी रोजदारीवर आणि कमिशन वर बाई माणसं ठेवण्यात आली होती.तेच लोक भांडे वाटपाची माहिती देऊन अर्ज भरून आणतात. त्यानंतर दलालच्या सेतु कार्यालयात त्यांनीच ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावर ग्रामसेवक व ठेकेदार यांच्या बनावट सही व शिक्के कॉपी पेस्टच्या आधारे तयार केली.तालुका कामगार सुविधा केंद्रावर कोणत्या दलालाच्या मार्फत अर्ज आले त्यावर काही चिन्ह टाकण्यात आली.टिक असलेले अर्ज तालुका कामगार सुविधा केंद्रांवरील कंत्राटी कर्मचारी आणि आरो यांनी प्रत्येक अर्ज मागे रक्कम ठरली ती मिळाली,तरच त्यांचीच त्यानुसार बांधकाम कामगार म्हणून बोगस नांव नोंदणी करून घेतली,आपोआप झाली नाही. त्यांनाच भांडे व पेटी वाटप झाले. कामगार संघटना कडून आलेले खऱ्या कामगारांचे अर्ज काही रक्कम मिळत नसल्यामुळे ग्रामसेवक व ठेकेदार यांच्या ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावरील आवक क्रमांक दिनांक ठरलेल्या जागी नसलातर अर्ज नाकरल्या जात होते. सही व शिक्का असतांना देखील काहीना काही क्षुल्लक कारणाने नाकरल्या जातो.इंजिनियर,ठेकेदारांचे वर्क ऑर्डर,बँक डिटेल मागण्यात येते होते.खऱ्या कामगारांची त्याची सर्व कागदपत्रे बरोबर असतांना हेतुपुरस्सर अर्ज त्रुटी काढल्या गेल्या.आणि खऱ्या कामगारांची अर्ज रद्द केला गेले.मग बोगस नांव नोंदणी कोणी केली त्यावर गुन्हे दाखल झाले काय ?. दक्षता पथक तपासणीचे काय झाले ?.किती बोगस कामगार दलाल पकडले?. हे जाहीर होतांना दिसत नाही.हे कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांना वाचवण्यासाठी चालले नाटक होते. यांचे अनेक पुरावे संघटनांनी सादर केले त्यांची दखल घेतल्या गेली नाही. कामगार संघटनाची दिशाभूल करण्यासाठी हे दक्षता पथक तपासणीचे ढोंग होते हे आता सिध्द झाले आहे.




### रश्मी राणे यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान

ठाणे (दैनिक संध्या) : मुंबई व ठाणे येथील राज्य कामगार विमा सोसायटीतील रुग्णालयातील रुग्णांची सेवा करताना कोणताही दुजाभाव न बाळगता अत्यंत आपुलकीने वागणाऱ्या,गेली २८ वर्षे सेवा देणाऱ्या ठाणे रुग्णालयातील जीवरसायन शास्त्रज्ञ या पदावर काम करणाऱ्या रश्मी राणे यांचा सन्मान पिंपरी येथील आकुर्डी रेल्वे स्थानकाजवळील ग.दि.माडगूळकर सभागृहात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.याप्रसंगी मंत्री आबिटकर यांनी ईएसआयसी मधील कर्मचारी आरोग्य व्यवस्थेचे खरे आधारस्तंभ आहेत. असा गौरव केला. वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय मुगळीकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.रेखा परिआनी, जीवरसायन शास्त्रज्ञ रश्मी राणे यांच्यासह ईएसआयसी रुग्णालयांतील तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी,परिचारिका कार्यालयीन कर्मचारी,सहाय्यक वैद्यकीय कर्मचारी,तसेच विविध रुग्णालयातील प्रत्येकी दोन अशा एकूण १७६ जणांचा सन्मान करण्यात आला.याप्रसंगी सचिव ई.रवींद्रन राज्य कामगार विमा सोसायटीचे आयुक्त रमेश चव्हाण,संचालक प्रशासन सोहम वायाळ,वैद्यकीय संचालक डॉ.अशोक थोरात, डॉ.आश्विनी गंगशेट्टीवार आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मोहननगरच्या राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ.वर्षा सुपे व सहकाऱ्यांनी केले होते.दरम्यान रश्मी राणे या विक्रोळीतील कन्नमवार नगरातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माजी महिला शाखाप्रमुख अहिल्या थोरवे यांच्या कन्या आहेत.त्यांनी गायनाचा छंद जोपासला आहे.विविध कार्यक्रमातून त्या गात असतात.त्यांच्या यशाने ठाणे मुंबई तील सर्वच सामाजिक,राजकीय पक्षांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.तर ठाण्यातील मनसेने त्यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविले आहे.



### दूध उत्पादकांना आयरीसॉईल ॲग्रीपॅकमुळे सेंद्रिय शेतीला चालना

नारायणगाव (दैनिक संध्या) : : दूध उत्पादक शेतकऱ्यांनी आन्विशा फार्म्स (लॅक्टो नॅचरल्स) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या आयरीसॉइल ॲग्रीपॅक (बायोगॅस व स्लरी फिल्टर प्रणाली) या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला आहे. या योजनेअंतर्गत सुमारे ₹५५,७४४ किंमतीचे आधुनिक बायोगॅस व सेंद्रिय खत निर्मिती संयंत्र शेतकऱ्यांना कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत अनुदानामुळे केवळ ₹१६,००० मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला थेट ₹३९,७४४ इतका आर्थिक फायदा मिळत आहे.या संयंत्रामुळे शेतकऱ्यांचा घरगुती गॅस खर्च मोठ्या प्रमाणात कमी होत असून, त्याचबरोबर गांडूळखत, द्रवरूप सेंद्रिय खत व इतर मूल्यवर्धित उत्पादनातून अतिरिक्त उत्पन्नाची संधी उपलब्ध होत आहे. परिणामी, शेतकऱ्यांना वर्षाकाठी अंदाजे ₹५०,००० ते ₹६०,००० पर्यंत आर्थिक लाभ होत असल्याचे दिसून येत आहे. या उपक्रमामुळे सेंद्रिय शेतीला चालना मिळत असून, पर्यावरणपूरक व स्वावलंबी शेतीच्या दिशेने शेतकरी वाटचाल करत आहेत. लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांकडून या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अधिकाधिक दूध उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आन्विशा फार्म्स यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रुग्णवाहिकांचे बॉडी किट्स पिनाकलकडून विकसित

पुणे (दै. संध्या)

**■ सुमित एसएसजीने महाराष्ट्राच्या एम.ई.एम.एस. १०८ प्रकल्पाकरिता प्रगत रुग्णवाहिका ताफा उपलब्ध करून देण्याकरिता पिनाकल इंडस्ट्रीजसोबत सहयोग केला**

महाराष्ट्रातील आपत्कालीन वैद्यकीय सेवा आणि प्रतिसाद सुविधा प्रबळ करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत सुमित एसएसजीने रुग्णवाहिका आणि विशेष वाहनांचे रूपांतर करणाऱ्या भारतातील आघाडीच्या पिनाकल इंडस्ट्रीजसोबत धोरणात्मक सहयोगाची घोषणा केली आहे. या सहयोगांतर्गत राज्यातील सर्वात महत्त्वपूर्ण सार्वजनिक आरोग्य उपक्रम महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा (एम.ई.एम.एस. १०८) प्रकल्पासाठी उच्च दर्जाच्या ॲडव्हान्स्ड लाईफ सपोर्ट (ए.एल. एस), बेसिक लाईफ सपोर्ट (बी. एल.एस) आणि निओनेटल (नवजात अर्भकांसाठी) रुग्णवाहिकांची रचना व पुरवठा केला जाईल.

सुमित एसएसजी बीव्हीजी महाराष्ट्र ईएमएस हा सुमित ग्रुप, बीव्हीजी इंडिया लिमिटेड आणि एसएसजी ट्रान्सपोर्ट सॅनिटारियो (स्पेन) यांचा संयुक्त उद्यम आहे. हा उद्यम १० वर्षांची सार्वजनिक खाजगी भागीदारी - डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट, ट्रान्सफर (पीपीपी-डीबीएफओटी) मॉडेल अंतर्गत १,७५६ आपत्कालीन वाहनांचा ताफा तैनात व ऑपरेट करेल. प्रगत तंत्रज्ञान, प्रशिक्षित कर्मचारी आणि एकात्मिक आपत्कालीन यंत्रणेद्वारे रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीची काळजी सुधारणे, जलद आपत्कालीन प्रतिसाद सुनिश्चित करणे आणि महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भागात आरोग्य सेवांचा विस्तार करणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

हा रुग्णवाहिका ताफा महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये तैनात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



सुमित एसएसजीचे अध्यक्ष श्री. सुमित साळुंके म्हणाले, "रुग्णवाहिका निर्मितीच्या क्षेत्रात पिनाकल इंडस्ट्रीजला खूप अनुभव आहे आणि एम.ई.एम. एस. १०८ प्रकल्पाच्या यशासाठी त्यांचा सहयोग अत्यंत महत्त्वाचा आहे. आमचा रुग्णवाहिका ताफा मजबूत, विश्वासार्ह, सुरक्षित आणि वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. पिनाकलची सिद्ध झालेली अभियांत्रिकी क्षमता खात्री देते की, आम्ही तैनात केलेली प्रत्येक रुग्णवाहिका जागतिक दर्जाच्या आपत्कालीन प्रतिसादासाठी आवश्यक असलेल्या मानकांची पूर्तता करेल."

"आम्हाला एवढ्या मोठ्या प्रमाणावरील आणि महत्त्वाच्या प्रकल्पासाठी सुमित एसएसजीसोबत सहयोग करण्याचा अभिमान वाटत आहे. पिनाकल इंडस्ट्रीजमध्ये आम्ही नेहमी उत्कृष्ट अभियांत्रिकी आणि रुग्ण-केंद्रित डिझाइनवर लक्ष केंद्रित करतो या उपक्रमाच्या माध्यमातून आमचा आपत्कालीन प्रतिसाद क्षमता सुधरण्याचा, तसेच जीव वाचवण्याच्या कार्यात मोलाचे योगदान देण्याचा मनसुबा आहे," असे पिनाकल इंडस्ट्रीज लिमिटेडचे कार्यकारी संचालक श्री. सचिन देशमुख म्हणाले.

या सहयोगाचा भाग म्हणून, पिनाकल इंडस्ट्रीज या प्रकल्पांतर्गत रुग्णवाहिकांची रचना आणि पुरवठा करेल, तसेच 'सुरुवातीपासून शेवटपर्यंत रुग्णवाहिका रूपांतरण भागीदार म्हणून काम करेल.

कंपनी शहरी आणि दुर्गम भागांसाठी जलद प्रतिसाद, वैद्यकीय कार्यक्षमता आणि रुग्ण सुरक्षितता लक्षात घेऊन तयार केलेल्या संपूर्ण वैद्यकीय परिवहन सोयीसुविधा उपलब्ध करून देईल.

प्रत्येक रुग्णवाहिकेमध्ये वैद्यकीय-दर्जाचे इंटिरिअर्स, मॉड्युलर स्टोरेज सिस्टम, रुग्णांच्या आरामासाठी प्रगत सुविधा आणि अपघातात सुरक्षित असणारी रचना असेल; ज्यामुळे भारतीय व जागतिक आरोग्यसेवा गतिशीलता मानकांचे पालन होण्याची खात्री मिळेल.

### फलटण येथील मुलीचा विनयभंग

फलटण (दै. संध्या)

उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या एका मुलीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी संबंधित मुलीने ओळखीच्या व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. संबंधित १८ वर्षांची मुलगी उपजिल्हा रुग्णालय, फलटण येथे उपचार घेत असताना तिच्या वॉर्डमध्ये तिच्या ओळखीचा अभिषेक अशोक सोडमिसे (रा. सोमंथळी, ता. फलटण, जि. सातारा) हा आला. त्यावेळी तिची आई डबा आणण्यासाठी बाहेर गेली होती. संशयिताने महिलेची चौकशी करत तिच्या बेडवर बसत तिच्याशी बोलणे सुरू केले. त्यानंतर त्याने महिलेच्या गळ्याला हात लावून विनयभंग केल्याचा आरोप आहे.

# ज्येष्ठांच्या सभागृहात युवा प्रतिनिधींचा सहभाग सक्षम लोकशाहीसाठी सकारात्मक संकेत – सभापती प्रा. राम शिंदे

पणजी (दै. संध्या)

महाराष्ट्र विधानपरिषद हे ज्येष्ठांचे सभागृह म्हणून ओळखले जात असले तरी अलीकडच्या काळात युवा प्रतिनिधींचा वाढता सहभाग आणि संख्याबळ सक्षम लोकशाहीसाठी सकारात्मक संकेत असल्याचे मत महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केले. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र - गोवा – गुजरात या विभाग –७ च्या पणजी येथे आयोजित वार्षिक परिषदेच्या उद्घाटनसत्रात ते बोलत होते. लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९ व १० एप्रिल, २०२६ रोजी ही परिषद पणजी येथे आयोजित करण्यात आली असून त्यास राज्यसभेचे उप सभापती श्री. हरिवंश सिंह, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष श्री. अण्णा बनसोडे, महाराष्ट्रासह राज्यविधानमंडळांचे सदस्य उपस्थित आहेत. गोवा विधानसभेचे अध्यक्ष डॉ. गणेश गावकर



आणि गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनीही या परिषद उद्घाटनसत्रात आपले महत्वपूर्ण विचार मांडले.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ विभाग –७ च्या या पणजी वार्षिक परिषदेत विकसित भारत २०४७ चे उद्दीष्ट साध्य करतांना विधिमंडळातील युवा सदस्यांची भूमिका आणि व्यापार, पर्यटन, नागरीकरण, पर्यावरण, तटीय संपर्कयंत्रणा यासाठी क्षेत्रीय प्राधान्यक्रम या दोन विषयांवर विचारमंथन होईल.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लखनऊ येथे झालेल्या पीठासीन अधिकारी परिषदेत या विभाग परिषद उपक्रमाची बीजे रोवली गेली आणि आज ती प्रत्यक्षात साकारली आहेत. '२०४७ पर्यंत विकसित भारत' या पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील राष्ट्रीय ध्येयाच्या पूर्ततेत युवा विधिमंडळ सदस्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

नागपूर हिवाळी अधिवेशन कालावधीत आयोजित केल्या जाणाऱ्या 'संसदीय अभ्यासवर्ग' उपक्रमाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, या माध्यमातून विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते आणि या उपक्रमातून घडलेले विद्यार्थी आज विधिमंडळात प्रतिनिधित्व करत आहेत. विधिमंडळ कामकाजातील युवा सदस्यांच्या सहभागाचे महत्व स्पष्ट करतांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे उल्लेखनीय योगदान सभापती प्रा. राम शिंदे यांनी अधोरेखीत केले.

परिषदेत 'व्यापार, पर्यटन, शहरीकरण, पर्यावरण आणि तटीय संपर्क' या महत्त्वाच्या विषयांवरही सखोल चर्चा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गुजरात, महाराष्ट्र आणि गोवा या तिन्ही राज्यांचा विस्तृत सागरी किनारा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, 'ब्लू इकॉनॉमी' मजबूत करताना मच्छीमार समुदायाचा विकास आणि पर्यावरण संवर्धन यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच, 'सर्क्युलर टुरिझम सर्किट' सारख्या संयुक्त पर्यटन उपक्रमांमुळे राज्यांमध्ये आर्थिक सहकार्य वाढू शकते, असेही त्यांनी नमूद केले. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर मुंबई, अहमदाबाद आणि पणजी यांसारखी शहरे 'स्मार्ट' बरोबरच 'संवेदनशील' आणि 'पर्यावरणपूरक' बनविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

ही परिषद म्हणजे केवळ औपचारिक संवाद नसून एक सामूहिक संकल्प आहे. सन - २०४७ च्या 'स्वर्णिम भारत' निर्मितीत विभाग ७ चा मोलाचा वाटा राहिल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या परिषदेमुळे तिन्ही राज्यांच्या विधिमंडळांमध्ये नव्या कल्पना, धोरणे आणि सहकार्याचा नवा अध्याय सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# महापारेषणची बाभळेश्वर–कुडूस ४०० के.व्ही. वीजवाहिनी कार्यान्वित

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा (महापारेषण) महत्त्वाकांक्षी बाभळेश्वर–कुडूस ४०० के.व्ही. हा वीजवाहिनी प्रकल्प गुरूवारी (दि.९) पूर्ण होऊन वीजवाहिनी कार्यान्वित करण्यात आली. या प्रकल्पामुळे वीजपुरवठा अधिक सक्षम, स्थिर आणि विश्वासार्ह होणार आहे. यामुळे सुमारे ५ मेगावॅट वीज नुकसान कमी होणार असून मुंबई महानगर प्रदेशातील विद्युत दाबामध्ये योग्य ती सुधारणा होणार आहे. तसेच या व्दिपथ वाहिनीवरून सुमारे ३००० मेगावॅटपर्यंत अतिरिक्त वीज वहन क्षमता उपलब्ध होणार असून मुंबई, ठाणे, पालघर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना मोठा फायदा होणार आहे. २०१० मध्ये मंजूर झालेल्या या प्रकल्पाची अंमलबजावणी मेसर्स कल्पतरू प्रोजेक्टस इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीमार्फत करण्यात आली. सुरुवातीला २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असलेला हा प्रकल्प विविध अडचणींमुळे



लांबला होता. मात्र, गतिमान शासनामुळे आणि संबंधित यंत्रणांच्या समन्वयामुळे अखेर मार्च २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्यात आले.

या प्रकल्पांतर्गत एकूण ७१५ मनोरे उभारण्यात आले असून सदर व्दिपथ वाहिनीची लांबी सुमारे २२८ कि.मी. आहे. यापैकी नाशिक विभागात ४८५ मनोरे उभारणी आणि ३०४ सर्किट कि.मी. तारा ओढण्याचे काम, तर वाशी विभागात २३० मनोरे उभारणी आणि १५२ सर्किट कि.मी. तारा ओढण्याचे काम पूर्ण झाले आहे. प्रकल्प राबविताना अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागला. पुणे जिल्ह्यातील जागतिक दर्जाच्या रेडिओ दुर्बिणीच्या (GMRT) परिसरातून मार्ग जात असल्याने विशेष परवानग्या घ्याव्या लागल्या. तसेच जमिनीचे मोबदले, वनविभाग परवानग्या, राईट ऑफ वे (मार्गाधिकार) (RoW) समस्या, साहित्य वाहतूक यांसारख्या अनेक आव्हानांवर मात करण्यात आली. काही भागात जंगलातून साहित्य वाहून नेण्यासाठी मानवी श्रमांचा वापर करावा लागला, तर काही ठिकाणी वीजवाहिन्यांवर हॉटलाइन स्ट्रिंगिंग करून काम पूर्ण करण्यात आले.

या वीजवाहिनीमुळे सद्यस्थितीतील पडघे–बाभळेश्वर १ व २ या वीजवाहिनीवरील ताण कमी होणार असून प्रणालीची विश्वासार्हता वाढणार आहे. कुडूस उपकेंद्राला अतिरिक्त वीज स्रोत उपलब्ध होऊन मुंबई परिसरातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता सुलभ होणार आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, महसूल विभाग, पोलिस आणि वनविभाग यांच्या सहकार्य व मदतीमुळे हा प्रकल्प मार्गी लागल्याचे महापारेषणने म्हटले आहे.

### अभिनव अरोरावर जीवघेणा हल्ला

मुंबई (दै. संध्या)

१० वर्षांचा कंटेंट क्रिएटर अभिनव अरोरो याच्यावर दिल्लीत जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ७ एप्रिल रोजी रात्री १० च्या सुमारास दिल्लीतील टिळक नगर परिसरात ही घटना घडली, जेव्हा अभिनव आपल्या कुटुंबासह कारमधून जात होता. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, अचानक काही लोकांनी त्यांच्या कारला घेराव घातला आणि शिवीगाळ करत हल्ला करण्यास सुरुवात केली. हल्ल्याचा व्हिडीओ अभिनव अरोराने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केला असून तो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

**थंड राहा आणि हसतमुख रहा; खास सवयींनी हा सीझन एन्जॉय**

# सोनी सब कलाकारांनी उघड केले त्यांचे उन्हाळ्यातील आवश्यक सामान

मुंबई (दै. संध्या)

उन्हाळ्याची तापमानं वाढत असताना सोनी सब चे कलाकार आपापल्या खास सवयींनी हा सीझन एन्जॉय करत आहेत. हायड्रेट राहणे, सीझनल पदार्थांचा आस्वाद घेणे आणि साध्या गोष्टींमध्ये आनंद शोधणे – याच्यातून ते उन्हाळा हलका आणि आनंदी बनवतात. कुटुंबाभिमुख कथाकथनासाठी ओळखला जाणारा सोनी सब आपल्या कलाकारांना एकत्र आणतो – यादें मधील गुलकी जोशी आणि सृष्टी सिंह, पुष्पा इम्पॉसिबल मधील मुस्कान बामने, तसेच इत्ती सी खुशी मधील सुम्बुल तौकीर खान आणि रजत वर्मा. हे सर्व कलाकार त्यांच्या उन्हाळ्यातील 'गो-टू एसेंशियल्स' आणि पर्सनल फेव्हरेट्स शेअर करत आहेत. उन्हाळ्यात ते कसे 'कूल', 'कम्फर्टेबल' आणि 'जॉयफुल' राहतात याची झलक प्रेक्षकांना मिळते.

यादें मध्ये डॉक्टर सृष्टीची भूमिका साकारणाऱ्या गुलकी जोशी यांनी सांगितले, "माझ्यासाठी उन्हाळा म्हणजे बॅलन्स – स्वतःची काळजी घेणं आणि सीझन एन्जॉय करणं. मी कधीच सनस्क्रीन स्किप करत नाही आणि हलकी स्किनकेअर वापरते ज्यामुळे त्वचा फ्रेश वाटते पण जड वाटत नाही. हायड्रेट राहणं खूप महत्त्वाचं आहे, म्हणून मी पाणी, नारळपाणी आणि कधी कधी आईस्ड टी यामध्ये बदल करत राहते. वेळ मिळाला की दहीचे पदार्थ किंवा ताजे फळं खायला मला खूप आवडतं त्यामुळे हलकं वाटतं आणि एनर्जी मिळते."

यादें मध्ये डॉक्टर वाणीची भूमिका साकारणाऱ्या सृष्टी सिंह यांनी सांगितले, "माझा समर रूटीन मी खूप ईझी आणि ब्रीदेबल ठेवते. कम्फर्टेबल कपडे, चांगला SPF लिप बाम आणि हायड्रेटिंग फेस मिस्ट हे नेहमी माझ्या बॅगमध्ये असतात. दिवसभर मी भरपूर पाणी आणि फ्रेश ज्यूस पिते. आणि खरं सांगायचं तर, दिवसभरानंतर घरी येऊन फॅन किंवा एसी चालू करून हातात थंड लिंबूपाणी घेणं यापेक्षा बेस्ट फीलिंग नाही."

पुष्पा इम्पॉसिबल मध्ये शनाया मेहताची भूमिका साकारणाऱ्या मुस्कान बामने यांनी सांगितले, "उन्हाळा आला की मला लगेच आमरस, थंड निंबूपाणी आणि कुटुंबासोबत रिलॅक्स्ड दुपार आठवते. सनस्क्रीन माझ्यासाठी मस्ट आहे कारण या उष्णतेत त्वचेची काळजी घेणं खूप गरजेचं आहे. शूटिंगदरम्यान मी नेहमी वॉटर बॉटल सोबत ठेवते, हायड्रेट राहण्यासाठी.

आणि खरं सांगायचं तर, दिवसभरानंतर घरी आल्यावर थंड ताकाचा ग्लास त्याला काहीच तोड नाही. सिंपल आहे पण खूप रिफ्रेशिंग."

इत्ती सी खुशी मध्ये अन्विता ची भूमिका साकारणाऱ्या सुम्बुल तौकीर खान यांनी सांगितले, "माझ्यासाठी उन्हाळा म्हणजे कम्फर्ट. सैल कॉटन कपडे हे मस्ट आहेत, कारण या हवामानात त्याने खूप फरक पडतो. मी नेहमी रोज वॉटर स्प्रे सोबत ठेवते, लांब शूटिंगदरम्यान लगेच फ्रेश वाटतं. आणि आईस्क्रीम तर नॉन-नेगोशिएबल आहे! सेटवर छोटा ब्रेक असो किंवा घरी रिलॅक्स करणं अशा छोट्या ट्रीट्समुळे सीझन हलका आणि हॅप्पी वाटतो."

इत्ती सी खुशी'मध्ये विराटची भूमिका साकारणारे रजत वर्मा यांनी सांगितले, "माझ्या मते उन्हाळ्यात 'कूल' आणि एनर्जेटिक राहणं हेच सगळ्यात महत्त्वाचं आहे. बाहेर जाताना मी नेहमी सनग्लासेस आणि कॅप वापरतो, त्यामुळे उन्हाचा त्रास कमी होतो.

नारळपाणी हे माझं फेव्हरेट आहे दिवसभर हायड्रेट आणि फ्रेश ठेवतं. आणि वेळ मिळाला की थंड फळं, विशेषतः कलिंगड, खायला मला खूप आवडतं. हेल्दी आहे आणि या सीझनसाठी परफेक्ट."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जुन्नर तालुक्यातील झेंडू उत्पादक शेतकरी अडचणीत

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील सावरगाव, निमदरी, निमगाव, वडज, पारुंडे, कुसूर, वैष्णवधाम, खिलारवाडी या भागातील शेतकरी मार्च, एप्रिल या महिन्यात लग्नसराई, यात्रा व सण उत्सवांचा हंगाम असल्याने चांगला बाजारभाव मिळण्याच्या अपेक्षेने फुल शेती करतात.मात्र यावर्षी मुंबईच्या दादर फुल बाजारात भाव कोसळल्याने झेंडूला सध्या प्रतिकिलो केवळ 10 ते 20 रुपये भाव मिळत असून, मेघना व परपल जातीच्या फुलांना 30 रुपये तर शेवंतीला 30 ते 40 रुपये दर मिळत आहे.या दरात उत्पादन खर्च तर दूरच मजुरीही निघत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले असून शेतकऱ्यांनी फुलाची तोडणी बंद केली आहे.शेतकरी सांगत आहेत की,जानेवारी- फेब्रुवारी महिन्यात झेंडूला 40 ते 50 रुपये प्रतिकिलो दर मिळत होता.परंतु एप्रिल मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे हा दर घसरून 10 -20 रुपयांवर आला आहे. त्यामुळे औषध फवारणीचा खर्च वाढला असून वाहतूक व हमाली व दलालीचा खर्च वजा केल्यानंतर हातात काहीच राहत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी फुले तोडणे बंद केले आहे.



### वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधान; माऊलींच्या दर्शनाने लाभला आध्यात्मिक आनंद

आळंदी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर महाराज संजीवनी समाधी मंदिर येथे अहमदपूर (जि.लातूर) येथील सुखमणी वृद्धाश्रमातील ३० वृद्ध माता-पित्यांनी मनोभावे दर्शन घेतले. भक्तीमय वातावरणात झालेल्या या दर्शनामुळे वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे भाव खुलून दिसत होते. या प्रसंगी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने सर्व वृद्धांचा आदरपूर्वक सन्मान करण्यात आला. संस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा यांनी माऊलींची प्रतिमा देऊन त्यांचा गौरव केला. यावेळी आळंदी नगरपरिषद चे मुख्याधिकारी माधव खांडेकर उपस्थित होते.नगरपरिषदेच्या वतीने त्यांनी माऊलींची मूर्ती प्रदान करून वृद्धांचा विशेष सन्मान केला. यानंतर संस्थान समितीकडून सर्वांना प्रसादाचे वितरण करण्यात आले. या पवित्र दर्शनामुळे वृद्धांना अविस्मरणीय आणि आध्यात्मिक समाधान देणारा अनुभव लाभला. या उपक्रमातून समाजात वृद्धांप्रती आदरभाव अधिक दृढ करण्याचा आणि त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा स्तुत्य प्रयत्न संस्थान समिती व आळंदी नगरपरिषद यांच्या वतीने करण्यात आला.




### डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलचा मोशी येथे अत्याधुनिक नेत्ररुग्णालयाचे उद्घाटन

मोशी (दैनिक संध्या) : महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज मोशी येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन केले. पुणे महानगर परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे. उद्घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल. या केंद्राचे उद्घाटन पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर श्री. नितीन काळजे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ४,२०० चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (LASIK), कॉर्निया, ग्लॉकोमा, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार परिणाम सुनिश्चित केले जातील.



### प्रामाणिकपणाबद्दल नंदा घाडगे यांचा स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान

सासवड (दैनिक संध्या) : सासवडच्या चिंतामणी हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या मावशी नंदा घाडगे यांना झाडलोट करताना दोन तोळ्यांची सोन्याची चेन पार्किंग जवळ सापडली. त्यांनी ती व्यवस्थापनाकडे सुपूर्द केली व नंतर ती मूळ मालकाला सुपूर्द करण्यात आली. घाडगे यांच्या या प्रामाणिकपणाचे कौतुक म्हणुन सामाजिक कार्यात कायम अग्रभागी असणाऱ्या स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने घाडगे यांना साडी व पाण्याचा फिल्टर भेट देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. या कौतुक सोहळ्यास स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सचिव हेमंत ताकवले, चिंतामणी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बाळासाहेब वांढेकर, डॉ. विनायक बांदेकर, डॉ. संध्या खळदकर, डॉ. भालचंद्र दीक्षित, कृष्णा शेट्टी, शहर पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष जीवन कड, सदस्य जगदीश शिंदे, पथॉलॉजि लॅबचे पांडुरंग गायकवाड, परिचारिका राजश्री शिवरकर, नुतन गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते.

# मॅटकेअर पुणेतर्फे ‘जननी आरोग्य शिबिरा’चे उद्घाटन

## महिला आरोग्य व प्रसूतीपूर्व सेवांपर्यंत पोहोच वाढवणे हा उद्देश

पुणे (दै. संध्या)

मॅटकेअर मॅटर्निटी अँड चाइल्ड हॉस्पिटलच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त, मॅटकेअर पुणेतर्फे सिम्बायोसिस ऑडिटोरियम, क्लोव्हर पार्क, विमान नगर, पुणे येथे ‘जननी आरोग्य शिबिरा’चे उद्घाटन करण्यात आले आहे. ही उपक्रमणा पुणे ओबीजिवाय सोसायटी, एनएमओ तसेच रोटरी क्लब यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असून, पुण्यातील महिला आणि गर्भवती मातांसाठी वेळेवर, तज्ज्ञ व विशेष उपचारांची उपलब्धता वाढवण्याच्या मॅटकेअरच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे हे द्योतक आहे. यापैकी एक आरोग्य शिबिर मॅटकेअर पुणे, कॉमन विंग बी, क्रमांक 232, एच नंबर 1-2, आनंद एमरल्ड एसआर, विमान नगर रोड, पुणे, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात येणार आहे.




या कार्यक्रमाचे उद्घाटन भारत सरकारचे केंद्रीय कॅबिनेट मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी ANC हँडबुकचे प्रकाशन केले तसेच पुणे आणि परिसरातील भागांमध्ये आयोजित होणाऱ्या 100 प्रसूतीपूर्व शिबिरांच्या नेटवर्कचा औपचारिक शुभारंभ केला. याप्रसंगी इंदिरा आयव्हीएफचे मॅनेजिंग डायरेक्टर नितिज मुर्डिया, मॅटकेअरचे वरिष्ठ प्रतिनिधी — मॅटकेअरचे सीईओ डॉ. निखिल यादव, मॅटकेअर पुणे येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रविण ठोकळ, मॅटकेअरच्या नॅशनल निओनॅटल हेड डॉ. वृशाली बिचकर, मॅटकेअरचे मेडिकल सुपरिंटेंडेंट व इंदिरा आयव्हीएफचे झोनल बिझनेस डायरेक्टर डॉ. अमोल लुंकड, तसेच मॅटकेअरच्या फॅसिलिटी डायरेक्टर डॉ. इशिता लुंकड उपस्थित होते.

‘जननी आरोग्य शिबिरा’च्या माध्यमातून पुण्यात एका दिवसात 100 प्रसूतीपूर्व शिबिरांद्वारे महिलांपर्यंत आणि समुदायापर्यंत मोफत प्रसूतीपूर्व तपासणी व महिला आरोग्य सल्ला पोहोचवण्यात येणार आहे. त्याचबरोबर ANC हँडबुकच्या माध्यमातून गर्भवती मातांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन मिळणार आहे.

या सर्वसमावेशक उपक्रमाद्वारे मॅटकेअर पुणे येथे मातृत्व आरोग्याबाबत जनजागृती वाढवणे, प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन देणे तसेच वेळेवर निदानाला चालना देणे, असा उद्देश ठेवण्यात आला आहे. केंद्रीय कॅबिनेट मंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले की, 100 प्रसूतीपूर्व शिबिरे आणि ANC हँडबुकसह जननी आरोग्य शिबिराची सुरुवात ही मातृ आरोग्यसेवांच्या पुरवठ्यातील एक परिवर्तनकारी पाऊल आहे.

सार्वजनिक – खाजगी भागीदारीद्वारे अत्यावश्यक आरोग्य सेवा कशा प्रकारे समुदाय पातळीपर्यंत पोहोचवता येतात, याचे हे उत्तम उदाहरण असून, यामुळे भारतातील मातृ आरोग्य पायाभूत सुविधा अधिक मजबूत होतील.

इंदिरा आयव्हीएफचे मॅनेजिंग डायरेक्टर नितिज मुर्डिया यांनी नमूद केले की, मॅटकेअरच्या पहिल्या वर्धापनदिनाला ‘जननी आरोग्य शिबिरा’ची जोड मिळाल्याने हा प्रसंग अधिक खास ठरला आहे. आवश्यकतेच्या ठिकाणीच सेवा पोहोचवणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. पुणे आणि परिसरातील भागांमध्ये एका दिवसात सेवा पोहोचवून, प्रसूतीपूर्व काळजी अधिक सुलभ, वेळेवर आणि कुटुंबांसाठी आवश्यकतेनुसार सहज उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

या प्रसंगी मॅटकेअरचे सीईओ डॉ. निखिल यादव म्हणाले की, प्रत्येक कुटुंबासाठी गुणवत्तापूर्ण मॅटर्निटी आणि चाइल्ड हेल्थकेअर अधिक सुलभ, आपुलकीपूर्ण आणि क्लिनिकली सक्षम बनवणे हे मॅटकेअरचे ध्येय आहे. पुण्यातील पहिल्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित ‘जननी आरोग्य शिबिर’ हे रुग्णालयाच्या या वचनबद्धतेचे प्रतीक असून, तज्ज्ञ सेवा रुग्णालया बाहेरही प्रभावीपणे पोहोचवण्याचा हा प्रयत्न आहे.

मॅटकेअरचे मेडिकल सुपरिंटेंडेंट व इंदिरा आयव्हीएफचे झोनल बिझनेस डायरेक्टर डॉ. अमोल लुण्कड़ यांनी सांगितले की, जननी आरोग्य शिबिरासारखे हेल्थकेअर आऊटरीच उपक्रम समुदाय पातळीवर जनजागृती वाढवणे आणि आरोग्यसेवांपर्यंतची दरी कमी करणे अत्यंत आवश्यक आहे.

महिलांच्या आरोग्यप्रवासातील प्रत्येक टप्प्यावर विश्वासार्ह व विशेष काळजी देणारी प्रणाली बळकट करण्यावर मॅटकेअरचा भर आहे. मॅटकेअरच्या फॅसिलिटी डायरेक्टर डॉ. इशिता लुण्कड़ यांनी सांगितले की, ही उपक्रमणा केवळ मोफत तपासण्यांपुरती मर्यादित नसून, महिलां आणि कुटुंबांसाठी सहकार्यशील, माहितीपूर्ण आणि आधार देणारे वातावरण निर्माण करण्याचा उद्देश आहे. हे पुण्यातील समुदाय सहभाग मजबूत करणारे आणि मॅटकेअरच्या ‘पेशंट फर्स्ट’ दृष्टिकोनाला अधिक बळ देणारे महत्त्वाचे पाऊल आहे.

मॅटकेअर पुणे येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रविण ठोकळ यांनी सांगितले की, नियमित प्रसूतीपूर्व तपासण्या आणि वेळेवर महिला आरोग्य स्क्रीनिंगमुळे आई व बाळ या दोघांच्याही आरोग्य परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा होते. जननी आरोग्य शिबिराच्या माध्यमातून महिलांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळावे आणि आरोग्यविषयक निर्णय आत्मविश्वासाने घेता यावेत, हा त्यामागचा प्रमुख उद्देश आहे.

# चाकण नगरपरिषदेच्या करवसुलीस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## अभय योजनेचा ११०० हून अधिक मिळकत धारकांना लाभ

चाकण (दै. संध्या)

चाकण नगरपरिषदेच्या वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष कर वसुली मोहिमेला आणि महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांनी जाहीर केलेल्या 'अभय योजनेला' चाकण मधील मिळकत धारकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे.

नगरपरिषदेने केलेल्या आवाहनाला दाद देत नागरिकांनी आपला थकीत व चालू कर व शास्ती कर भरण्यास प्राधान्य दिले असून, दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत शहरात सुमारे ९ कोटी ८३ लाख रुपयांची विक्रमी मालमत्ता कर वसुली झाली आहे. चाकण नगरपरिषदेने चालू आर्थिक वर्षासाठी एकूण १५ कोटी २० लाख रुपयांची एकूण मागणी निश्चित केली होती. यामध्ये पूर्वीची थकीत मागणी व शास्ती १० कोटी ६६ लाख रुपये आणि मागील आर्थिक वर्षाची चालू मागणी ४ कोटी ५४ लाख रुपये इतकी होती. प्रशासनाने केलेल्या विशेष वसुली अभियान, योग्य व नियोजनबद्ध पाठपुराव्यामुळे वसुलीचे आकडे समाधानकारक पाहायला मिळत आहेत. थकीत कर भरणाऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या 'अभय योजने'चा चाकण मधील १,११२ मिळकत धारकांनी फायदा घेतला आहे. या योजनेअंतर्गत एकूण ४ कोटी ८३ लाख रुपयांच्या शास्तीपैकी (दंड) अंदाजे १ कोटी ५० लाख रुपयांची शास्ती माफ करण्यात आली आहे. यामुळे अनेक कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, थकीत कराचा बोजा कमी करण्यास मदत झाली आहे.

नगरपरिषदेच्या या यशस्वी वसुली मोहिमेमुळे शहराच्या विकास कामांना गती मिळणार आहे. ज्या नागरिकांनी अद्याप आपला मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी त्वरित कर भरून शहराच्या विकास प्रक्रियेत सहभाग नोंदवावा." - डॉ. अंकुश जाधव, मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा सुरेश गोरे, कर अधिकारी सुनील गोरडे, सहाय्यक कर निरीक्षक नेहा कुलकर्णी, वरिष्ठ लिपिक प्रियंका राऊत व चाकण नगरपरिषदेच्या सर्व विभागातील संवर्ग अधिकारी आणि कर्मचारी यांचे यासाठी विशेष सहकार्य लाभले.

# नारायणगावात श्री साईबाबांच्या खऱ्याखुऱ्या पादुकांचा दर्शन सोहळा

नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव (ता.जुन्नर) येथील श्रीक्षेत्र मुक्ताबाई देवी समाज मंदिर सभागृहात गुरुवार दि . ९ रोजी श्री साईबाबांच्या खऱ्याखुऱ्या पादुका दर्शन सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दर्शन सोहळा सुरू होण्यापूर्वी नारायणगाव बस स्थानकापासून श्री मुक्ताबाई मंदिरापर्यंत फुलांची उधळण करत वाजत गाजत पालखीमध्ये श्री साईबाबांच्या पादुका आणण्यात आल्या. याप्रसंगी आरोग्य शिबिर तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने शेकडो साई भक्तांनी तसेच इच्छुक रक्तदात्यांनी रक्तदान केले व



आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. या रक्तदान शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक महिला भगिनींनी या रक्तदान शिबिरात सहभाग घेऊन रक्तदान केले. तसेच पत्रकार किरण वाजगे यांनी ५५ व्या वेळी रक्तदान केले.

दरम्यान येथील श्री मुक्ताबाई समाज मंदिरात साईबाबा यांच्या तत्कालीन साकार स्वरूपातील खऱ्याखूऱ्या पादुका दर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. या पादुकांचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले.

# मेंगाळवाडीत 320 रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी

नारायणगाव (दै. संध्या)

मेंगाळवाडी येथे श्री म्हसोबा महाराज यात्रा उत्सवानिमित्त भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत करण्यात आले होते. या शिबिरात परिसरातील 320 रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन जुन्नर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी शिवाजी भोईर,पंचायत समिती सदस्य प्रशांत डोंगरे,ग्रामपंचायत सदस्य मनीषा वारे, गोरक्ष फापाळे, सामाजिक कार्यकर्ते किशोर भोईर आणि दशरथ भोईर उपस्थित होते.

या आरोग्य शिबिरासाठी डॉ.भास्कर वारे, भारती वारे, डॉ.संजय दुधवडे, डॉ. संध्या दुधवडे,डॉ. जालिंदर वाजे, डॉ. मंगल वाजे, डॉ. संदीप वारे,आणि दुर्वेश वारे यांनी विशेष सहकार्य करून रुग्णांवर मधुमेह, रक्तदाब, स्त्रियांच्या मासिक पाळीच्या समस्या, संधिवात यांसारख्या विविध आजारांवर बारकाईने तपासणी करून मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक शंकर केदारी यांनी केले.

# जेजुरी ग्रामीण रुग्णालयात कॅन्सर रुग्णासाठी परिहार सेवा

जेजुरी (दै. संध्या)

सिप्ला फाउंडेशन सलग्न कॅन सपोर्ट एंजीओ आणि ग्रामीण रुग्णालय जेजुरी यांच्या संयुक्त विद्यमानाने परिहार सेवा ओपीडी, पॅलेटिव्ह केअर ओपीडी दर गुरुवारी सकाळी दहा ते चार या वेळेत चालू करण्यात आली असल्याचे जेजुरी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रताप साळवे यांनी सांगितले.

या परीहार सेवेचे उद्घाटन हे जेजुरी नगरपरिषदच्या आरोग्य विभागाच्या उपसभापती प्रज्ञा राऊत, नगरसेविका स्नेहल भालेराव नीलम सातभाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कॅन सपोर्ट



या एनजीओ संस्थेचे प्रमुख डॉक्टर सिंग उपस्थित होते.

पोलीएटीव्ह केअर म्हणजे दीर्घकालीन असाध्य किंवा जीवघेण्या आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेदना मुक्त सन्मानपूर्वक गुणवत्तापूर्वक जीवन देण्यासाठी दिली जाणारी समग्र सेवा आहे. ही सेवा केवळ रुग्नापूर्ती मर्यादित नसून त्या कुटुंबीयांनाही मानसिक सामाजिक व भावनिक आधार देणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. कर्क रोगातील प्रगत टप्प्यातील रुग्ण, अंतिम टप्प्यातील मूत्रपिंड, यकृत, हृदय, फुफुस निकामी झालेले रुग्ण, पक्षघाता नंतर अपंगत्व आलेले रुग्ण, मेंदू संदर्भातील आजार, दीर्घकालीन मानसिक आजार असलेले रुग्ण,दीर्घकाळ अंथरुणावर असणारे रुग्ण,एच आय व्ही व टिबी चे प्रगत रुग्ण, गंभीर जन्मजात आजार असणारी मुले यावर जेजुरी ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येणार आहे. या रुग्णांसाठी दोन बेड राखीव ठेवण्यात आले असल्याची माहिती ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ प्रताप साळवे यांनी यावेळी दिली.

ही पॉलिटिव्ह केअर ओपीडी सेवा दिनांक 9 एप्रिल सुरू करण्यात आली असून कॅन्सपोर्ट एनजीओ चे डॉ नागार्जुन सोनकांबळे हे दर गुरुवारी या परिहार सेवा पेलेटिव्ह केअर सेवेसाठी ग्रामीण रुग्णालयात उपस्थित राहून रुग्णांची तपासणी करणार आहेत.

# अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांनी घेतला मोकळा श्वास

शिरूर (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील एकूण ११७ अतिक्रमित शिव व पानंद रस्त्यांपैकी तब्बल ३८ रस्ते खुले करण्यात यश आले, तर ६५ रस्त्यांची मोजणी पूर्ण झाली आहे. शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे संस्थापक अध्यक्ष शरद पवळे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली , तर हजारो शेतकरी

एकेकाळी शेतमाल खांद्यावर वाहत, चिखलातून वाट काढत बाजारपेठ गाठणारा शेतकरी... आज त्याच शेतकऱ्याला थेट रस्त्याची साथ मिळू लागली आहे. शेतीसाठी लागणारी साधनसामग्री, मुलांच्या शिक्षणाचा प्रवास, आणि गावागावातील दैनंदिन जीवन—सगळंच आता सुलभ होऊ लागलं आहे. वाद-विवादांच्या जागी सहकार्याची भावना निर्माण होत आहे.

मुंबईतील आझाद मैदानावरील आंदोलनाने या लढ्याला दिशा दिली. शासनानेही सकारात्मक भूमिका घेत अर्जानंतर ९० दिवसांत रस्ता खुला करण्याचे आदेश दिले. मोजणी व पोलीस बंदोबस्त शुल्क माफ करत ‘मुख्यमंत्री बळीराजा योजना’ अंतर्गत रस्त्यांच्या विकासाला गती देण्यात आली.

प्रशासनाच्या एकत्रित प्रयत्नांतून आतापर्यंत १६३८ शेती गटांची मोजणी पूर्ण झाली असून, सुमारे १६१ किलोमीटर लांबीचे रस्ते खुले झाले आहेत. ४८ रस्त्यांची सातबारा नोंद ही या परिवर्तनाची अधिकृत नोंद ठरली आहे.

अतिक्रमण हटवण्यास अडथळा आणणाऱ्यांवर कायद्याचा कठोर बडगा उगारत आय पी सी ३५३ व १८८ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नियम मोडणाऱ्यांचे आधारकार्ड व फार्मर आयडी पाच वर्षांसाठी बंद करण्याचा इशाराही




देण्यात आला आहे—कारण हा लढा केवळ रस्त्यांचा नाही, तर शेतकऱ्यांच्या हक्कांचा आहे.

यापुढे रस्त्यांच्या कडेला दगडी क्रमांक चिन्हे बसवून स्पष्ट सीमा निश्चितीची मागणीसह ‘झिरो पेंडन्सी’पाठपुरावा होणार आहे.

शेतकऱ्यांच्या कष्टांना मिळालेला सन्मान, संघर्षाला मिळालेलं यश आणि भविष्याकडे नेणारा विश्वासाचा रस्ता. शिव पाणंद शेतरस्ता चळवळीला मोठे यश; अतिक्रमण हटविण्यासाठी शासनाचा कडक निर्णय शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांच्या प्रश्नावर सुरू असलेल्या शिव पाणंद शेतरस्ता चळवळीला मोठे यश मिळाले असून, चळवळीचे प्रणेते शसद पवळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. राज्य शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार गाव नकाशावर दर्शविलेल्या व शासकीय जमिनीवरील रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत.

शासन निर्णयानुसार, संबंधित रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींना तहसीलदारामार्फत नोटीस देण्यात येणार असून, दिलेल्या मुदतीत अतिक्रमण काढले नाही तर प्रशासनाकडून थेट कारवाई केली जाणार आहे.

तसेच अतिक्रमण करणाऱ्यांना त्या ठिकाणी पीक लागवड करता येणार नाही. याशिवाय अशा व्यक्तींचे आधार कार्ड व फार्मर आयडी पाच वर्षांसाठी ब्लॉक करण्यात येणार असून, शासनाच्या विविध योजनांचा लाभही त्यांना मिळणार नाही.

या कारवाईसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ (कलम १४३) व मामलतदार अधिनियम १९०६ (कलम ५) अंतर्गत प्रशासनाला स्पष्ट अधिकार देण्यात आले आहेत.

दरम्यान, पाणंद रस्त्यासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देत शासनाने नोंदणीकृत हक्कसोड पत्र (बक्षीसपत्र) करण्यासाठी स्टॅम्प ड्युटी व नोंदणी शुल्क माफ केले आहे. मात्र, एकदा दिलेली जमीन पुन्हा मागण्याचा हक्क संबंधित शेतकऱ्याला राहणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हास्तर व विधानसभा क्षेत्रस्तरावर समित्या स्थापन करण्यात येणार असून, कामांच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटदारांची तांत्रिक पात्रता निश्चित करण्यात आली आहे. तसेच कंत्राटदारांकडून सुरक्षा ठेव घेण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

शिव पाणंद चळवळीच्या या यशामुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी आवश्यक असलेले रस्ते मोकळे होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, ग्रामीण भागातील शेती विकासाला मोठी चालना मिळणार आहे असे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी प्रसारमाध्यमांना बोलताना सांगितले यावेळी राज्य प्रसिद्धी प्रमुख रविंद्रजी खुडे, समन्वयक विजयजी शेलार, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र बापू सानप उपस्थित होते.